दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

## सुविचार

"धर्म संरक्षण देतो, तेथे भीतीला जागा नसते; राजकारण समानतेवर उभे असते, तेथे विभागणीला जागा नसते. समाज जागा झाला, तर दडपशाही क्षणात कोसळते."

## इंडिगो प्रकरणी चौघांचे निलंबन

**नवी दिल्ली :** देशातील विमान वाहतूक व्यवस्थेत सुरू असलेल्या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर, नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने महत्त्वपूर्ण कारवाई केली, त्यांच्या चार निरीक्षकांना निलंबित केले. हे अधिकारी विमान वाहतूक सुरक्षा, पायलट प्रशिक्षण आणि ऑपरेशनल अनुपालनाचे निरीक्षण करतात. इंडिगोचे सीईओ पीटर एल्बर्स आज हजर होणार होते.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शनिवार, दि. १३ डिसेंबर, २०२५ | वर्ष - १ | अंक - ८० | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

## सारांश वृत्त

### राज्यात तीन वर्षांत १४,५२६ बालमृत्यू

**नागपूर :** महाराष्ट्रातील सात जिल्ह्यांमध्ये गेल्या तीन वर्षांत १४,५२६ बालमृत्यूंची नोंद झाली आहे, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत सरकारी नोंदींचा हवाला देऊन दिली. भाजप आमदार स्नेहा दुबे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या लेखी उत्तरात आबिटकर यांनी ही माहिती दिली.

### जल जीवनसाठी केंद्राकडून निधी नाही

**नागपूर :** महाराष्ट्राला ऑक्टोबर २०२४ पासून 'जल जीवन मिशन' योजनेसाठी केंद्रीय निधी मिळालेला नाही आणि चालू प्रकल्प पूर्ण करण्यासाठी राज्य निधी वापरला जात आहे, असे महाराष्ट्र सरकारने सांगितले. विधिमंडळाच्या चालू हिवाळी अधिवेशनादरम्यान एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात, सरकारने असेही म्हटले आहे की निधीच्या कमतरतेमुळे विद्यमान प्रकल्पांच्या गतीमध्ये अडथळा निर्माण झाला आहे. जल जीवन मिशन (जेजेएम) चे उद्दिष्ट भारतातील प्रत्येक ग्रामीण घराला कार्यक्षम नळाच्या पाण्याचे कनेक्शन प्रदान करणे हा आहे.



### कोलकाता येथे बाजारपेठेत आग

**कोलकाता :** दक्षिण कोलकात्यातील रामगड येथील एका बाजारपेठेत शुक्रवारी पहाटे आग लागली, ज्यात सुमारे ४० दुकाने जळून खाक झाली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यांनी सांगितले की, दाट लोकवस्ती असलेल्या परिसरातील दुकानांच्या समूहात पहाटे १.३० च्या सुमारास आग लागली. आग विझविण्यासाठी सात अग्निशमन दलाच्या गाड्यांना सुमारे दोन तास लागले.

## आवश्यक ते १० टक्के संख्याबळ गाठण्यात विरोधक ठरले अपयशी

# महाराष्ट्र विधानसभेला विरोधी पक्ष नेताच नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे : एमहाराष्ट्र विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाने राज्यातील राजकीय परिस्थितीतील एक गंभीर आणि विदारक वास्तव अधोरेखित केले आहे. ते म्हणजे राज्याच्या विधानसभेला अद्याप अधिकृत विरोधी पक्षनेता नाही. लोकशाही व्यवस्थेतील एका महत्त्वाच्या स्तंभाच्या अनुपस्थितीमुळे निर्माण झालेली पोकळीही यातून ठळकपणे समोर आली आहे.**



महाविकास आघाडीतील उबाठा, काँग्रेस आणि शरद पवार यांच्या गटाला किमान दहा टक्के जागांवर विजय मिळविण्यात अपयश आले. त्यामुळे विरोधी पक्षनेता पदासाठी आवश्यक असलेली वैधानिक अट ते पाळू शकले नाहीत. परिणामी, विरोधी पक्षनेता निवडण्याची प्रक्रिया अडून बसली आहे. याशिवाय सत्ताधारी महायुतीनेही मनाचा मोठेपणा न दाखवता, योग्य तो निर्णय घेण्यास टाळाटाळ केली. विरोधकांच्या अपयशामुळे निर्माण झालेली परिस्थिती अधिक गुंतागुंतीची आणि लोकशाहीला बाधा आणणारी बनली आहे.

राज्यात अधिकृत विरोधी पक्षनेता नसताना सुरू असलेले हिवाळी अधिवेशन केवळ विधानसभा कार्यप्रणालीवरच नव्हे, तर राज्यातील एकंदरीत राजकीय समीकरणांवर दूरगामी परिणाम करणारे ठरले आहे. कोणत्याही परिपक्व लोकशाहीत विरोधी पक्षनेता हे अत्यंत महत्त्वाचे पद मानले जाते. सरकारच्या कारभारावर लक्ष ठेवणे, चुकीच्या धोरणांना आव्हान देणे, पर्यायी भूमिका मांडणे आणि जनतेच्या भावना सत्ताधाऱ्यांपर्यंत पोहोचवणे या सर्व जबाबदाऱ्या विरोधी पक्षनेत्याकडे असतात. त्यामुळे या पदाची अनुपस्थिती म्हणजे विधानसभेच्या प्रभावी कामकाजातील ती एक मोठी उणीव ठरते. सत्ताधारी महायुतीने विरोधी पक्षनेता निवडण्यास सहकार्य केले नाही, अशी टीका होत असली, तरी लोकशाहीत आवश्यक त्या १० टक्के संख्याबळाची अट पूर्ण न करणे, हे महाविकास आघाडीचे अपयश आहे. दिल्लीत एकूण ७० जणांच्या विधानसभेत भाजपचे केवळ ३ सदस्य असतानाही आपच्या अरविंद केजरीवाल यांनी २०१५ मध्ये भाजपला विरोधी पक्ष नेतेपद दिले, याला संविधानिक उद्देशांचा आदर म्हणून बघावे लागेल.

विरोधी पक्षनेता हा संसदीय लोकशाहीतील एक महत्त्वाचा घटक असून, सरकारच्या धोरणांवर आणि निर्णयांवर रचनात्मक टीका करणे, सरकारला जबाबदार धरणे, महत्त्वाच्या नियुक्त्यांमध्ये सल्लामसलत करणे, 'शॅडो प्राईम मिनिस्टर' किंवा 'शॅडो कॅबिनेट' म्हणून काम करणे आणि सरकारला पर्याय उपलब्ध असल्याचे दर्शवणे ही त्याची जबाबदारी असते. महाराष्ट्रात म्हणूनच सक्षम विरोधी नेत्याची उणीव भासत आहे.

महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात प्रथमच विधानसभा कोणत्याही अधिकृत विरोधी पक्षनेत्याविना अधिवेशनास बसली आहे. या अभूतपूर्व परिस्थितीचा परिणाम म्हणून सरकार अधिक मनमानी पद्धतीने निर्णय घेत असल्याची टीका होत आहे. विधिमंडळाच्या कामकाजात विरोधकांची भूमिका संघटित, प्रभावी आणि ठोस असावी, अशी जनतेची अपेक्षा असते. पण आजची परिस्थिती या अपेक्षांना तडा देणारी ठरत आहे. विरोधी पक्ष मजबूत नसल्यास सत्तेला उत्तरदायित्वाची जाणीव कमी होऊ शकते.

गुजरात विधानसभेत इतिहासातील पहिल्यांदा २०२३ मध्ये विरोधी पक्षनेता निवड झाली नाही. कारण काँग्रेसकडे पुरेशी संख्या नव्हती आणि विधानसभेचे अध्यक्षाने विरोधी पक्षनेतेपदासाठी अर्ज स्वीकारला नाही. २०२३ मध्ये कर्नाटक विधानसभेचे अधिवेशन झाले, त्यातही विरोधी पक्षनेता नव्हता. तेलंगणातही २०१९-२०२३ या कालावधीत अधिकारित विरोधी पक्षनेतेपद रिक्त होते.

महाराष्ट्र विधानसभेत दोन्ही सभागृहांमध्ये अधिकृत विरोधी पक्षनेते नाही. कारण विरोधी पक्षांकडे आवश्यक १०% सदस्यसंख्या नाही आणि सरकारकडून या पदाला मान्यता मिळवण्यात अडचण येत आहे. सरकार नियमांच्या आधारे ही नेमणूक करत नाही, असे दिसून येते.

### संसदेतील परिस्थिती

● भारताला १९५० मध्ये संविधान मिळाले, पण त्यात विरोधी पक्षनेता या पदाचा कोणताही स्पष्ट उल्लेख नव्हता. त्या काळात संसदेतील विरोधकांची संख्या कमी असल्याने औपचारिक विरोधी नेता नियुक्त केला जात नव्हता. विरोधी नेता हा शब्द वापरला जात असला, तरी त्याला कायदेशीर दर्जा नव्हता. १९७७ च्या लोकसभा निवडणुकांनंतर काँग्रेस पक्ष पराभूत झाला आणि मोरारजी देसाई यांच्या नेतृत्त्वाखाली जनता पक्ष सत्तेत आला. त्या वेळी काँग्रेसचे यशवंतराव चव्हाण हे भारताचे पहिले अधिकृत विरोधी पक्षनेता झाले. २०१४ व २०१० मध्ये काँग्रेसकडे आवश्यक त्या १०% जागा नव्हत्या, त्यामुळे लोकसभेला अधिकृत विरोधी पक्षनेता नव्हता.

# तपोवन परिसरात वृक्षतोडीला स्थगिती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** नाशिकमधील तपोवन परिसरातील वृक्षतोडीला राष्ट्रीय हरित लवादाकडून १५ जानेवारीपर्यंत स्थगिती देण्यात आली आहे. ही स्थगिती अंतरिम आहे आणि कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वृक्षतोडी थांबविण्याचा आदेश देण्यात आला आहे.

हरित लवादामधे नाशिकमधील तपोवनातील वृक्षतोडीच्या विरोधात याचिका दाखल करण्यात आली होती. हरित लवादाने तपोवनातील वृक्षतोडीला १५ जानेवारीपर्यंत स्थगिती दिली आहे. हा अंतिम आदेश नाही, तर अंतरिम आदेश आहे. नाशिकमध्ये २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीसाठी तपोवन परिसरात साधू-महंतांच्या निवासासाठी ११५० एकर जमिनीवर साधूग्राम उभारण्याची योजना आहे. या कामासाठी सुमारे १८०० झाडांची तोड प्रस्तावित होती, ज्यामुळे स्थानिक नागरिक, पर्यावरणप्रेमी आणि अनेक सेलिब्रिटींनी तीव्र विरोध नोंदवला आहे.

अभिनेते सयाजी शिंदे, उबाठाचे उद्धव ठाकरे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही वृक्षतोडीविरोधात भूमिका स्पष्ट केली. मनसे आणि उबाठा गटाकडून तपोवन वृक्षतोडीविरोधात स्थानिक आंदोलन छेडण्यात आले होते.

## सर्वोच्च न्यायालयात युक्तीवादावर येणार मर्यादा

# आता न्यायाला विलंब नको : सरन्यायाधीश सूर्यकांत दास

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** सामान्यांना मिळणाऱ्या न्यायासाठी आता विलंब नको, अशी कठोर भूमिका सरन्यायाधीश सूर्यकांत दास यांनी घेतली असून, त्यासाठीच त्यांनी ऐतिहासिक घोषणा केली आहे. जानेवारी २०२६ पासून प्रत्येक सुनावणीत वकिलांच्या युक्तिवादासाठी कठोर वेळेची मर्यादा लागू केली जाईल. गरीब आणि सामान्य अशिलांचे खटले देखील नियोजित तारखेला ऐकता यावेत, यासाठी न्यायालयीन वेळेचे समतोल वाटप सुनिश्चित करण्यासाठी हे करण्यात आले आहे, असे त्यांनी नमूद केले आहे.

देशभरातील मतदार याद्यांच्या सुरू असलेल्या विशेष सघन पुनरावृत्ती (एसआयआर) संबंधित अनेक जनहित याचिकांच्या सुनावणीदरम्यान सरन्यायाधीशांनी ही टिप्पणी केली. अनेक ज्येष्ठ वकील खंडपीठासमोर दीर्घ युक्तिवाद सादर करत असताना, सूर्यकांत म्हणाले, जे घडत आहे ते पूर्णपणे अन्याय्यकारक आणि विसंगत असे आहे. एक गरीब व्यक्ती मोटार अपघात भरपाई किंवा जामीन मागण्यासाठी न्यायालयात येतो, परंतु काही वकिलांच्या तासनतास चालणाऱ्या युक्तिवादामुळे, त्याचा खटला चालत नाही आणि तो निराश होऊन परततो, असे निरीक्षण त्यांनी नोंद केले.

सरन्यायाधीशांनी स्पष्ट केले की, आतापासून कोणताही वकील मनमानी वेळेसाठी युक्तिवाद करू शकणार नाही. नवीन नियमानुसार: अंतिम सुनावणीसाठी असलेल्या प्रकरणांमध्ये प्रत्येक वकिलाला लेखी सबमिशन दाखल करणे बंधनकारक असेल. तोंडी युक्तिवाद पूर्ण करण्यासाठी त्याला किती वेळ लागेल हे त्यात स्पष्टपणे लिहिलेले असावे. अंतिम सुनावणीसाठी सूचीबद्ध केलेल्या प्रकरणांमध्ये कोणतीही स्थगिती दिली जाणार नाही. वेळेचे काटेकोरपणे पालन केले जाईल.

बारमध्ये बऱ्याच काळापासून तक्रार आहे की काही स्टार ज्येष्ठ वकील आणि कार्यकर्ते वकील/याचिकाकर्ते खूप काळ युक्तिवाद करतात किंवा वारंवार जनहित याचिका दाखल करतात, ज्यामुळे सामान्य अशिलांचे खटले मागे राहतात. अशा याचिका त्वरित नोंदवल्या जात नाहीत म्हणून कधीकधी न्यायाधीशांवर असंवेदनशीलतेचा आरोप केला जातो. सरन्यायाधीशांनी या विशेषाधिकारप्राप्त वागणुकीला न्यायव्यवस्थेतील असंतुलनाचे प्रमुख कारण म्हणून उद्धृत केले आणि सांगितले की आता न्यायालयीन वेळ समान रीतीने वाटला जाईल.

सरन्यायाधीशांनी एक हृदयस्पर्शी घटना सांगितली. ते म्हणाले एका गरीब विधवेच्या पतीचा रेल्वे ट्रॅकवर मृत्यू झाला. तिने भरपाईसाठी खटला लढला. २३ वर्षांनंतर, सर्वोच्च न्यायालयाने तिला भरपाई म्हणून ८ लाख रुपये दिले. तोपर्यंत, ती न्यायव्यवस्थेबद्दल इतकी निराश झाली होती की ती विस्मृतीत गेली. एका तरुण वकिलाने तिला शोधण्यासाठी परिश्रम घेतले. तिच्याकडे बँक खातेही नसल्याचे आढळून आले. खाते उघडण्यात आले आणि पैसे जमा करण्यात आले. २३ वर्षांनंतर तिच्या चेहऱ्यावर आलेले हास्य हे न्यायव्यवस्थेचे खरे काम आहे. वेळेत न्याय देऊन आपल्याला प्रत्येक अशिलाच्या चेहऱ्यावर हास्य आणायचे आहे, असेही ते म्हणाले.

## विनोद तावडे यांचेही नाव चर्चेत

# भाजपच्या राष्ट्रीय पक्षाध्यक्षपदी फडणवीस?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भाजपच्या राष्ट्रीय पक्षाध्यक्षपदाच्या शर्यतीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावाचा समावेश असून, राज्यातील आणखी एक बडे नेते विनोद तावडे यांचेही नाव संभाव्य पक्षाध्यक्षपदांच्या यादीत आहे. विद्यमान प्रमुख जेपी नड्डा यांचे उत्तराधिकारी कोण, या प्रश्नाचे उत्तर अद्याप भाजपला मिळालेले नाही.

उत्तर प्रदेश भाजप अध्यक्षपदाची निवडणूक अंतिम टप्प्यात आली आहे. उत्तर प्रदेश प्रमुखाचे नाव रविवार, १४ डिसेंबर रोजी जाहीर केले जाईल. यासोबतच पक्षाच्या पुढील राष्ट्रीय अध्यक्षाच्या निवडीबाबत चर्चा तीव्र झाल्या आहेत.

माजी केंद्रीय मंत्री आणि भाजपचे राज्य संघटन निवडणूक अधिकारी महेंद्रनाथ पांडे यांनी गुरुवारी नामांकन प्रक्रियेची घोषणा केली. प्रदेशाध्यक्ष निवडणुकीसाठी नामांकन अर्ज शनिवार, १३ डिसेंबर रोजी दुपारी १ ते २ या वेळेत दाखल केले जातील. ही प्रक्रिया केंद्रीय निवडणूक निरीक्षक विनोद तावडे यांच्या देखरेखीखाली पार पडेल. त्यानंतर केंद्रीय निवडणूक अधिकारी पियुष गोयल १४ डिसेंबर रोजी नवीन अध्यक्षाचे नाव जाहीर करतील.

पक्षाच्या ५० टक्के संघटनात्मक घटकांच्या अध्यक्षांची निवड झाल्यानंतर पक्षाचा राष्ट्रीय अध्यक्ष निवडला जाऊ शकतो. यापूर्वी, १६ डिसेंबर रोजी खरमास सुरू होण्यापूर्वी भाजप अध्यक्षाची निवड करू शकते अशी अटकळ होती. सूत्रांच्या हवाल्याने असे म्हटले आहे की आरएसएस प्रमुख मोहन भागवत भाजपने सुचवलेल्या नावाशी सहमत होऊ शकतात. तथापि, संघ किंवा पक्षाने अधिकृतपणे यावर भाष्य केलेले नाही.

# थरूर यांची बैठकीला दांडी!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** काँग्रेससोबतचे संबंध बिघडलेले असताना, खासदार शशी थरूर सलग तिसऱ्यांदा पक्षाच्या बैठकीला उपस्थित राहिले नाहीत. शुक्रवारी काँग्रेसच्या लोकसभा खासदारांची बैठक झाली, त्याला थरूर अनुपस्थित होते. सलग तिसऱ्यांदा शशी थरूर यांनी पक्षाच्या बैठकीला उपस्थित राहिले नाहीत. थरूर यांनी पंतप्रधान मोदी यांचे अनेक वेळा कौतुक केले आहे. त्यामुळे काँग्रेसमध्ये त्यांच्याबद्दल अस्वस्थतेची स्थिती असल्याचे मानले जाते.

हिवाळी अधिवेशन १९ डिसेंबर रोजी संपणार असून, त्यापूर्वी राहुल गांधी यांनी काँग्रेसच्या सर्व ९९ लोकसभा खासदारांची बैठक बोलावली होती. हिवाळी अधिवेशनाच्या येत्या काळात सत्ताधारी पक्षाला कसे कोंडीत पकडायचे हे ठरवण्यासाठी ही बैठक होती. शशी थरूर या बैठकीला उपस्थित राहिले नाहीत.

थरूर यांच्या माजी मैत्रिणीने माहिती दिली होती की ते गुरुवारी कोलकाता येथे असतील. त्यांनी लिहिले होते की माझे दीर्घकाळचे सहकारी जॉन कोशी यांचे कोलकाता येथे लग्न आहे. याशिवाय, माझी बहीण स्मिता थरूर यांचा वाढदिवस देखील आहे. दरम्यान, मी एका कार्यक्रमात देखील सहभागी होणार आहे. खासदार मनीष तिवारी देखील या काँग्रेस बैठकीला उपस्थित नव्हते. त्यांच्याबद्दलही वारंवार चर्चा झाल्या आहेत.

## मायक्रोसॉफ्टची राज्यात मोठी गुंतवणूक

# फडणवीस आणि नडेला यांची बैठक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मायक्रोसॉफ्ट सीईओ सत्या नडेला यांची आज मुंबईत बैठक झाली. मायक्रोसॉफ्टकडून मुंबईत मोठी गुंतवणूक करण्यात येणार आहे. याबाबत देवेंद्र फडणवीस आणि सत्या नडेला यांच्यात चर्चा झाली. आजच्या या बैठकीसाठी हिवाळी अधिवेशन सोडून देवेंद्र फडणवीस तातडीने मुंबई पोहोचले होते.

मायक्रोसॉफ्ट सीईओ सत्या नडेला यांच्यासोबत बैठक झाल्यानंतर देवेंद्र फडणवीसांनी माध्यमांशी बोलत नेमकी कोणती चर्चा झाली, याबाबत माहिती दिली. मायक्रोसॉफ्टचा महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणुकीचा विचार आहे. मायक्रोसॉफ्टसोबत ग्लोबल कपॅबिलिटी सेंटर हा महत्वकांक्षी प्रकल्प करण्याचा प्रयत्न आहे. २० लाख स्क्वेअर फुटांची जीसीसी महाराष्ट्रात उभारण्यात येईल, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

४५ हजार जणांना जीसीसीद्वारे रोजगार उपलब्ध होतील. याबाबत लवकरच सामंजस्य करार करण्यात येईल, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. महाराष्ट्राला एआय हब करण्याबाबत मायक्रोसॉफ्ट सकारात्मक आहे. बैठकीत प्राईम एआय ओएसची चित्रफीत दाखवली. इतर क्षेत्रात एआयचा कसा वापर करता येईल त्यांसदर्भात चर्चा झाली, अशी माहिती देवेंद्र फडणवीसांनी यावेळी दिली.

मायक्रोसॉफ्ट भारतात १७.५ अब्ज डॉलरची गुंतवणूक करणार आहे. अमेरिकन टेक कंपनीची ही आतापर्यंतची सर्वात मोठी गुंतवणूक असेल. या निधीचा वापर एआय, क्लाउड आणि डेटा सेंटर यांसारख्या पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी केला जाईल. भारतात मायक्रोसॉफ्ट १.५७ लाख कोटी गुंतवत असून, ही आशियातील सर्वात मोठी गुंतवणूक आहे.

# संतोष वर्मा याची अखेर पदावरून हकालपट्टी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** ब्राह्मण महिलांबद्दल अपमानास्पद टिप्पणी करणाऱ्या आयएएस अधिकारी संतोष वर्मा यांच्यावर कारवाई सुरू करण्यात आली असून, त्यांना मध्य प्रदेश कृषी विभागाच्या उपसचिव पदावरून काढून टाकण्यात आले आहे. कारणे दाखवा नोटीसला उत्तर देताना आयएएस अधिकारी संतोष वर्मा यांनी दिलेले उत्तर समाधानकारक नसल्याचे मध्य प्रदेशाचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी सांगितले. त्यांच्याविरुद्ध आरोपपत्र जारी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

मुख्यमंत्री मोहन यादव यांनीही संतोष वर्मा यांच्याविरुद्ध दाखल केलेल्या बनावट कागदपत्रांच्या प्रकरणात त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले. प्रशासकीय सेवेतून पदोन्नती मिळवण्यासाठी बनावट कागदपत्रांचा वापर केल्याचा आरोप करत त्यांनी केंद्र सरकारला त्यांची बडतर्फीची शिफारसही केली आहे. ब्राह्मण महिलांविरुद्ध त्यांनी केलेल्या अपमानास्पद वक्तव्यावरून सुरू असलेल्या गदारोळात वर्मा यांच्याविरुद्ध ही कारवाई करण्यात आली आहे.

संतोष वर्मा म्हणाले होते की, जोपर्यंत ब्राह्मण आपली मुलगी आपल्या मुलाला दान करत नाही किंवा त्याच्याशी संबंध ठेवत नाही, तोपर्यंत आरक्षण सुरू राहिले पाहिजे. वर्मा यांचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर मुख्यमंत्री मोहन यादव यांनी त्यांना पदावरून काढून टाकण्याचे आदेश दिले. वर्मा यांच्या या वक्तव्यामुळे संताप व्यक्त झाला आणि त्यांचा जाहीर निषेधही करण्यात आला.

## शेतकरी नेते रघुनाथदादा पाटील यांची मागणी

# साखर संकुलचे नामकरण ऊस संकुल करा

■ श्याम पिंपळे

**पुणे : नव्या पुण्यातील साखर संकुलाची इमारत ही शेतकऱ्यांच्या कष्टाच्या पैशाने उभारलेली आहे. त्यावर शेतकऱ्यांचा पहिला हक्क असला पाहिजे. दुर्दैवाने तिथे शेतकऱ्यांना प्रवेश सुध्दा दिला जात नाही. संघासाठी राखीव केलेला आहे. शेतकऱ्यांना साखर संकुल इमारतीचा फायदा द्यायचा असेल तर साखर आयुक्ताचे नाव बदलून ऊस आयुक्त करणे गरजेचे आहे.**

साखर संकुल इमारतीचा पूर्ण एक मजला शेतकऱ्यांची वजनचोरी आणि रिकव्हरीचोरी करणाऱ्या साखर सम्राटांनी राष्ट्रीय साखर सहकारी कारखाना याबाबत शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष रघुनाथदादा पाटील यांनी यापूर्वीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना कळविले आहे. हुतात्मा बाबू गेनू आणि शेतकरी संघटनेचे संस्थापक शरद जोशी यांच्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून साखर आयुक्तांचे नामकरण ऊस आयुक्त असे आपल्याला करावे लागेल, असा इशारा दिला आहे.

साखर आयुक्तांचे नाव बदलून ऊस आयुक्त असे करण्यासाठी शेतकरी बांधवांनी सकाळी ११ वाजेपर्यंत पुण्यात




पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमधून शेतकरी दाखल झाले. यावेळी भारतीय किसान संघ परिसंघ नवी दिल्ली चे राष्ट्रीय अध्यक्ष तथा शेतकरी संघटनेचे महाराष्ट्र अध्यक्ष रघुनाथ दादा पाटील यांच्यासह क्रांतिसिंह नाना साहेब पाटील शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष शिवाजी नाना नादखिळे, शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष तथा भारतीय किसान संघ-परिसंघ नवी दिल्लीचे सचिव कालिदास आपेट यांच्यासह पश्चिम महाराष्ट्रातील शेकडो शेतकरी उपस्थित होते.

रघुनाथदादा पाटील म्हणाले की, उसाला प्रति टन साडेसात हजार रुपये भाव मिळावा. कारण सन १९६० पासून दर १० वर्षांनी नैसर्गिकरित्या ऊसाचे भाव दुप्पट झाले आहेत. शरद पवारांनी राजू शेट्टी खासदार असताना सन २०१० साली एसएमपी कायद्याचे रुपांतर एफआरपी कायद्यात केले. तेव्हापासून दर १० वर्षांनी नैसर्गिकरित्या ऊसाचे दर दुप्पट होण्याची नैसर्गिक प्रक्रिया बंद झाली. मागील १५ वर्षांपासून ऊसाचे भाव प्रतिटन २५०० रुपये ते ३५०० रुपये प्रतिटन एवढेच आहेत. याउलट उत्तर प्रदेशात ऊस मंत्रालय असल्याने ऊसाची सरकार निर्धारित किंमत प्रतिटन ४५०० रुपये झाली आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

एफआरपीचा कायदा झाल्यापासून सातत्याने रिकव्हरीचा वाद उकरून काढला जातो. एसएमपीचा कायदा ८.५% रिकव्हरीसाठी लागू होता. एफआरपीचा कायदा १०.२५% रिकव्हरीसाठी लागू केला. पावणे दोन टक्के रिकव्हरी वाढविली याचा अर्थ आजच्या भावाने सुमारे ७०० रुपये प्रतिटन ऊसाचा भाव कमी केला आहे. ऊसाला हाच दर एकरकमी मिळाला पाहिजे. यासाठी राजू शेट्टी उच्च आणि सर्वोच्च न्यायालयात भांडण्याचे नाटक करीत आहेत. शरद पवार आणि राजू शेट्टी शेतकऱ्यांना नेहमीच मुर्ख समजत आहेत, असा आरोप त्यांनी केला.

## विशेष संपादकीय

### "बंगालचा स्वाभिमान—धर्माच्या नावावर दडपशाही नाही!"

**कोलकात्यातील गीता पठण कार्यक्रमातील मांस विक्रेत्यांवरील अपमानास्पद कारवाईने राज्याच्या सामाजिक जागरूकतेला धक्का दिला, आणि त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी दिलेला स्पष्ट इशारा—"हे बंगाल आहे, उत्तर प्रदेश नाही"—हे केवळ राजकीय प्रत्युत्तर नाही; तर बंगालच्या ऐतिहासिक धर्मनिरपेक्षतेची पुन्हा एकदा आठवण करून देणारा ठोसा आहे.**

धर्माच्या नावावर भीती निर्माण करण्याचा प्रयत्न कुठेही सुरू झाला, तरी बंगालची जमीन त्याला सहज स्वीकारत नाही. याच भूमीने १९०५ मध्ये ब्रिटिशांची 'फूट पाडा आणि राज्य करा' ही नीती रवींद्रनाथ टागोरांच्या राखीबांधणी आंदोलनातून उधळून लावली. हिंदू-मुस्लीम ऐक्याची ही परंपरा पुढे काजी नजरुल इस्लामच्या कवितांपासून नेताजींच्या राष्ट्रीय लढ्यात अधिक दृढ झाली. त्यामुळे आज, कोलकात्यातील गीता पठण कार्यक्रमात दोन मांस विक्रेत्यांचे पदार्थ फेकून देणे, त्यांना सार्वजनिक उठा-बशा काढायला लावणे—ही घटना केवळ क्षुल्लक किंवा अपघातजन्य मानता येत नाही. ती बंगालच्या मुलभूत स्वभावाला धक्का देणारी आहे. म्हणूनच मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी यावर दिलेला स्फोटक प्रतिसाद—"हे पश्चिम बंगाल आहे, उत्तर प्रदेश नाही!"—हा राजकीय रागाचा भाव नव्हे; हा बंगाली समाजाच्या ऐतिहासिक स्वाभिमानाचा प्रतिध्वनी आहे. धार्मिक ध्रुवीकरणाचा खेळ काही राज्यांत उघडपणे सुरू असेल, प्रशासन स्वतःही त्या भूमिकेत कधीकधी सहभागी असेल. मात्र, बंगालमध्ये त्यासाठी ना सामाजिक जमीन, ना सांस्कृतिक परवानगी आहे. ममता बॅनर्जी म्हणतात, "गीता हे राजकारणाचे हत्यार नाही. धर्माचा अर्थ संरक्षण, विभागणी नाही." हा संदेश केवळ राजकीय नव्हे, तात्त्विक आहे. कारण गीता, उपनिषदें, सूफी परंपरा—या सगळ्याच्या पायात 'कर्तव्य' आणि 'करुणा' हेच मूल्य आहे. धर्माच्या नावावर भीती दाखवणे, लोकांना सार्वजनिक पद्धतीने अपमानित करणे—ही संस्कृती बंगालची नाही. नदिया जिल्ह्यातील सभेत ममता बॅनर्जी यांनी या प्रकरणातील सर्व आरोपींना रातोरात अटक करण्यात आल्याची माहिती दिली. हा प्रतिसाद तातडीचा होता, आणि त्यामागे संदेश स्पष्ट—कायद्याचा वापर भीती पसरवणाऱ्यांना रोखण्यासाठीच होणार, नागरिकांना वश करण्यासाठी नाही. भाजपच्या राज्यांमध्ये धर्मावर आधारित फूट पाडण्याचा खेळ सुरू असल्याचा त्यांचा आरोप नवीन नाही, पण आजच्या संदर्भात तो अधिक अर्थपूर्ण ठरतो. कारण गेल्या दशकभरात धार्मिक ओळखीतून राजकीय संवाद घडवण्याचा प्रयत्न वाढत चालला आहे. १९९२ च्या बाबरीकाळात देशात ज्या ज्वाला पेटल्या, त्या वेळी बंगालने तुलनेने शांततेचा मार्ग का निवडला? २००२ नंतर हिंसेच्या झळा देशभर जाणवल्या, पण बंगालमध्ये प्रशासनाने परिस्थिती ताब्यात का ठेवली? उत्तर एकच—येथील समाजाची मूळ जडणघडण विभाजनकारक नसून समन्वयात्मक आहे. येथील लोक देवावर श्रद्धा मनातून ठेवतात, गाजावाजा करून नव्हे. धार्मिक कार्यक्रमात 'ठरवून वातावरण तापवणे' ही पद्धत बंगाली मानसिकतेला परकी आहे. म्हणूनच बॅनर्जींची प्रश्नोत्तरे तितकीच टोकदार—"गीता वाचण्यासाठी राजकीय सभा कशाला? श्रद्धेला राजकीय पोशाख का?" बंगालच्या पिढ्यान्पिढ्या चालत आलेल्या समंजसपणाला पायदळी तुडवणारी घटना जेव्हा समाजासमोर येते, तेव्हा राजकीय रंग चढवण्याची गरज पडत नाही—लोक स्वतःच सावध होतात. हा भाग ममता बॅनर्जी उत्तम जाणतात. म्हणूनच त्यांनी 'भय निर्माण करण्याचा कोणताही प्रयत्न मोडीत काढू' असा संदेश केवळ राजकीय प्रतिस्पर्ध्यांना नाही, तर अशा प्रवृत्तीला शरण जाणाऱ्या कोणालाही दिला आहे. नेताजींच्या INA मध्ये धर्म विचारला जात नव्हता; एकत्रित देशासाठी लढणे महत्त्वाचे होते. काजी नजरुल इस्लाम म्हणाले होते, "धर्म प्रेम शिकवतो, भेदभाव नव्हे." टागोरांनी सांगितले—"भारतराष्ट्राची संस्कृती विविधतेत आहे." या तीन विचारधारांचा संगम म्हणजे बंगाल. त्यामुळे धार्मिक ओळखीतून हिंसा भडकवण्याचा प्रयत्न इथे झाला, की जनता त्याची व्याप्ती लगेच ओळखते. आजच्या घटनेतही तेच दिसले. समाजाने नाराजी व्यक्त केली, प्रशासनाने कारवाई केली आणि मुख्यमंत्री स्वतः पुढे येऊन संदेश दिला—"भीतीचे राजकारण बंगालमध्ये चालणार नाही." हा संदेश फक्त एका घटनेपुरता मर्यादित नाही. हा भविष्यासाठीचा इशारा आहे—भारताचे भविष्य धार्मिक आधारावर नव्हे, तर मूल्याधारित लोकशाहीवर उभे राहिले, तरच त्याची विविधता टिकेल. बंगाल तेच सांगत आहे: धर्म म्हणजे मार्गदर्शन, पण राज्यकारभार म्हणजे संयम, न्याय आणि समानता. हे दोन एकत्र मिसळून भीतीचे रसायन तयार करणाऱ्यांना या भूमीत जागा नाही.

■ **-डॉ. अशोक बालगुडे,** संपादक, दै. राज्य लोकतंत्र, पुणे

---

### सत्याचा विपर्यास, इतिहासाची मोडतोड

# 'वंदे मातरम्'वरून राजकारणाचा पापड!

■ **डॉ. अशोक बालगुडे**

**संसदेच्या हिवाळी अधिवेशनात पेटलेला 'वंदे मातरम्' वाद हा राष्ट्रीय प्रश्न नव्हता — तो सरळसरळ निवडणुकीचा राजकीय मुद्दा होता. आधीच तापलेल्या राजकारणात सत्ताधारी आणि विपक्ष दोघांनी मिळून इतिहासाची अशी गाठोडी केली की सत्य धुरकटून गेले. पंतप्रधान नरेंद्र मोदींपासून ते विरोधक नेत्यांपर्यंत — सगळ्यांनीच अर्धसत्यांच्या चेंडूवर संघराजकारणाचा चौकार मारण्याचा प्रयत्न केला. भावना पेटवून मतपेट्या तापवण्याचा उपक्रम, त्यापलीकडे काहीही नव्हता.**



'वंदे मातरम्' — स्वातंत्र्यलढ्यातून उसळलेला पहिला मोठा राष्ट्रीय आरोह. या गीताने ब्रिटिश साम्राज्याच्या कण्याला हादरा दिला होता. परंतु दीडशे वर्षांच्या या परंपरेचा सन्मान करायचा तर इतिहासाच्या पूर्ण संदर्भासह करायला हवा. आज मात्र हेच गीत राजकारणाच्या कढईत टाकून पापडासारखे पातळ-पातळ लाटले जात आहे. ज्या गीतातून वीरांची प्रेरणा उसळली, त्या गीताला आज मतपेटीत टाकण्यासाठी सुटलेली धावपळ — याला देशभक्ती म्हणायची की राजकीय दांभिकता? पंतप्रधान मोदींनी संसदेतील भाषणात १९३७ च्या काँग्रेस निर्णयाचा उल्लेख करत नेहरू, इंदिरा गांधी आणि काँग्रेसवर आघाडीचा लाट ओढला. 'काँग्रेसने मुस्लिम लीगसमोर नाक टेकले' हा आरोप त्यांच्या भाषणातील चमकदार ठिणगी होती; पण इतिहासाच्या किलबिलीत ती ठिणगी पेट घेऊ शकत नाही. कारण तो काळ ब्रिटिशांच्या 'फोडा आणि राज्य करा' धोरणाचा कळस होता.

हिंदू-मुस्लिम ऐक्य टिकवणे हे स्वातंत्र्यलढ्यातील राजकीय आणि सामाजिक गरज होती. आज मात्र त्या स्थितीचे राजकीय भान न ठेवता, त्या निर्णयावर 'समर्पण'चा शिक्का मारण्याचा प्रयत्न होत आहे. इतिहास जितका जटिल, तितकाच आजच्या राजकारणाला असुविधाजनक. म्हणूनच तो सोपा करून विकणे राजकारणाला सोपे जाते — सत्याचा विपर्यास हा त्याचा स्वभावधर्म. विरोधकांनीही यामध्ये भर टाकली. प्रियंका गांधींनी नेहरूंच्या तुरुंगवासावर केलेला चुकीचा आकडा हा विरोधी पक्षाच्या बाजूनेही सत्यद्रोहाचाच नमुना ठरला. सत्ताधारी इतिहास वाकवतात आणि विरोधक तथ्य मोडतात — अशा दोन्ही बाजूंच्या इतिहासद्रोही संधीसाधूपणामुळे संसदेत 'वंदे मातरम्' वाद एका क्रीडा स्पर्धेसारखा दिसत राहिला. खरा प्रश्न असा की, १९३७ च्या निर्णयामागे होते काय? 'वंदे मातरम्'च्या संपूर्ण गीतातील धार्मिक प्रतिमा काही समुदायांना अस्वस्थ करतात. हे त्या काळातील जवळजवळ सर्व राष्ट्रीय नेत्यांना माहीत होते. गांधी, मौलाना आझाद, सरदार पटेल, नेताजी बोस, राजेंद्र प्रसाद — कोणाचाही विरोध धार्मिक नसून 'राष्ट्रवाद सर्वसमावेशक असावा' या तत्त्वाशी निगडित होता. म्हणूनच काँग्रेसने दोनच कडव्यांना अधिकृत मान्यता दिली. ही 'तडजोड' नसून, ब्रिटिशांची सांप्रदायिक विघटनकारी नीती निष्फळ करण्याची बुद्धीमान चाल होती. आज टागोरांचे नाव मोठ्या उत्साहात वापरले जाते; पण त्यांनीही नंतर प्रार्थना किंवा राष्ट्रीय कार्यक्रमात सर्वमान्य भागच वापरावेत, असा मतप्रवाह मांडला होता — हा संदर्भ मात्र वर्तमान राजकीय कथानकातून पूर्णपणे वगळला जातो. कारण सत्याचा संपूर्ण आरसा उभा राहिला, तर ध्रुवीकरणाची माती कोरडी पडेल. १९०६ मध्ये ब्रिटिशांनी 'वंदे मातरम्'वर बंदी घातली तेव्हा हिंदू-मुस्लिम विद्यार्थी एकत्र रस्त्यावर उतरले होते — आज मात्र हा इतिहास आठवण्यात कोणालाच रस उरलेला नाही. त्या संघर्षात सांप्रदायिक विभागणी नव्हती. आजच्या राजकीय व्यूहात मात्र एकाच समुदायावर हा विरोध टाकून संशयाची फूट पाडण्याचा प्रयत्न होत आहे.

संघ परिवाराचा इतिहासात असलेला 'रिकामा पृष्ठभाग' हा मुद्दाही तितकाच महत्त्वाचा आहे. RSS ने स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेतला नव्हता — हे त्यांच्या दस्तऐवजांतून स्पष्ट होते. 'संघावर बंदी येऊ नये' या भीतीने त्यांनी थेट आंदोलन टाळले. 'वंदे मातरम्'चे सामूहिक गायन हा त्यांच्या दिनक्रमाचा भाग नव्हता.

आज मात्र नव्याने लिहिलेल्या भावनिक इतिहासात संघ परिवाराला स्वातंत्र्यलढ्याचे वरिष्ठ पात्र म्हणून उभे करण्याचा प्रयत्न चालू आहे. जिथे प्रत्यक्ष इतिहासात पाय नाहीत, तिथे भावनिक खांब रोवून नवे वर्णन उभे करण्याचा हा राजकीय उपक्रम म्हणावा लागेल. 'फक्त मुस्लिमांनी विरोध केला' हा दावा तर ऐतिहासिकदृष्ट्या केवळ अपूर्ण नाही, तर जाणीवपूर्वक दिशाभूल करणारा. त्या काळातील शीख, जैन, दक्षिण भारतीय विद्वान, काही संत-परंपरा आणि तत्त्वचिंतक गटांनीही गीतातील प्रतिमांवर प्रश्न उपस्थित केले होते. हा प्रश्न धार्मिक वा राजकीय नव्हता; तर 'एक बहुविध राष्ट्र एका गीतात कसे सामावेल?' हा व्यापक सांस्कृतिक विचार होता. आज मात्र हा विस्तृत संदर्भच गाळून 'एका समुदायाचा विरोध' असा एकपात्री निष्कर्ष पुढे सरकवला जातो. कारण तो ध्रुवीकरणाला पोषक असतो. २४ जानेवारी १९५० — संविधान सभेचा अतिशय सुजाण, विलक्षण दूरदृष्टीचा निर्णय. 'जन गण मन' राष्ट्रगीत, 'वंदे मातरम्' राष्ट्रगीताचा सन्मान राखणारे राष्ट्रीय गीत — दोन्हींना समान आदर. कोणालाही कमी-मोठे न ठरवता भारताचा चेहरा 'समावेशक' म्हणून निश्चित करणे — हा निर्णय जितका व्यापक, तितकाच आजच्या राजकीय वादांसाठी असुविधाजनक. म्हणूनच हा निर्णय आज विकृत अर्थांमध्ये रंगवला जातो.

#### सत्याचा प्रकाश मंद केला जात आहे

परिस्थिती इतकी विकृत झाली आहे की 'वंदे मातरम्'सारख्या गीताचेही राजकीय मालकी हक्क मागितले जातात. गीत कोणाचे? देशाचे. त्यावर कोणाचा हक्क? जनतेचा. पण आज त्याची मालकी राजकीय गट आपापल्या 'भावनिक बाजारात' विकू इच्छितात. अर्धसत्यांनी सजवलेल्या या ताटातली भाजी समाजासाठी विषारीच ठरते. प्रत्यक्षात 'वंदे मातरम्' ही भारताच्या आत्म्याची धून आहे — ती कोणत्याही पक्षाची, संस्था-समूहाची किंवा मतपत्रिकेची मालमत्ता नाही. तिचा वापर श्रद्धेने व्हायला हवा; राजकीय उरफाड्यात नाही. इतिहासाचे चिरे मोडून, संदर्भाचे हाडे तोडून आणि सत्याच्या मणक्याला वाकवून तयार केलेल्या देशभक्तीची चमक पोकळ असते. आजचा सर्वात मोठा धोका हा — देशभक्ती ही भावना नसून रणधुमाळीतले हत्यार बनवले जात आहे. इतिहासाचा आदर करायचा असेल, तर तो पूर्ण वाचावा, पूर्ण समजावा आणि पूर्ण सांगावा. 'वंदे मातरम्'चा सन्मानही तसाच — भेद न पाडता, सत्य न पुसता, संपूर्ण संदर्भासह. कारण सत्य जितके स्पष्ट, तितके ध्रुवीकरण करणे कठीण. आणि कदाचित म्हणूनच आज सत्याचा प्रकाश मंद केला जात आहे.

---

## परदेशी शिक्षणाचे आमिष पडले महाग

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** शिक्षणासाठी अमेरिकेत असलेल्या मुलाला तातडीने फी पाठवण्याची गरज भासल्याने एका पालकाने चिखलीत राहणाऱ्या व्यक्तीवर विश्वास ठेवला; पण याच विश्वासाचा गैरफायदा घेत त्याची तब्बल १५ लाख ७५ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली. तीन तासांत पैसे अमेरिकेत पोहोचवून देण्याचे आमिष दाखवत ही आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार उघड झाला आहे.

तक्रारदार पालक अमेरिकेत शिकणाऱ्या मुलाची शैक्षणिक फी भरण्यासाठी चिंताग्रस्त होता. या दरम्यान त्याची ओळख एका व्यक्तीशी झाली. त्याने "आपल्या ओळखीच्या लोकांमार्फत तीन तासांत पैसे अमेरिकेत पोहोचतील" असा विश्वास दिला. विश्वासात घेत तक्रारदाराकडून आरटीजीएसद्वारे १५.७५ लाख रुपये स्वतःच्या खात्यावर मागवून घेतले. पैसे मिळताच आरोपीने संपर्क बंद केला. पैसे न पोहोचल्याची खात्री झाल्यावर पालकाने पोलिसांकडे धाव घेतली. चौकशीत हा प्रकार फसवणुकीचा असल्याचे स्पष्ट झाले.

**चिखलीत पालकाची १६ लाखांची फसवणूक**

## आळंदीतील दोन भाविकांचे अपहरण

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** संत ज्ञानेश्वर महाराजांच्या दर्शनासाठी आळंदीला आलेल्या दोन ज्येष्ठ नागरिकांना दुचाकीवरून आलेल्या दोघांनी जबरदस्ती पळवून नेत नातेवाईकांकडे २ लाखांची खंडणी मागितली. धमकावत ठेवलेल्यांची माहिती मिळताच पोलिसांनी तत्पर कारवाई करून आरोपी महिला व पुरुषाला अटक केली. मंगळवारी दुपारी चार वाजता चाकण चौकात घडलेल्या या प्रकारामुळे तीर्थक्षेत्रात खळबळ उडाली असून आळंदी पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

## फरार माजी नगरसेवकावर 'मकोका'

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी गुन्हेगारांवर कारवाई सुरु केली आहे. चऱ्होली येथे व्यावसायिकाच्या डोक्यात गोळ्या घालून ठार केल्याच्या गुन्ह्यात फरार असलेला आरोपी माजी नगरसेवक किसन महाराज तापकीरसह सहा जणांच्या टोळीवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मकोका) अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. या टोळीसह चिखली मधील अनिरुद्ध जाधव, एमआयडीसी भोसरी मधील राहुल लोहार, दिघी मधील विक्रांत देवकुळे या टोळ्यांवर देखील मकोकाची कारवाई केली आहे. आर्थिक वादातून नितीन गिलबिले या व्यावसायिकाचा गोळ्या घालून खून करण्यात आली. यामध्ये पोलिसांनी पाच जणांना अटक केली. सातवा साथीदार माजी नगरसेवक किसन उर्फ महाराज ज्ञानोबा तापकीर हा फरार आहे. तोच या गुन्ह्याचा सूत्रधार असल्याचे सांगितले जात आहे. दिघी पोलिसांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार या सात जणांच्या टोळीवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली असून यातील आरोपींवर सात गंभीर गुन्हे दाखल आहेत. टोळी प्रमुख अमित जीवन पठारे (३३, चऱ्होली बुद्रुक), विक्रांत सुरेश ठाकूर (३८, सोळू, खेड), सुमित फुलचंद पटेल (३१, दिघी), आकाश सोमनाथ पाठारे (२३, चऱ्होली बुद्रुक), सोमनाथ प्रकाश पाटोळे (२४, सोळू, खेड), किसन उर्फ महाराज ज्ञानोबा तापकीर (चऱ्होली बुद्रुक) अशी कारवाई झालेल्या आरोपींची नावे आहेत. दिघी पोलिसांनी आणखी एका टोळीवर मोकाचा प्रस्ताव पाठवला होता. टोळी प्रमुख विक्रांत उर्फ सरडा प्रकाश देवकुळे (२४), सुरज राजू चव्हाण (२०), साहिल उर्फ विश्वास मुकेश लोट (१९), शुभम सुमित डिंगीया (२४, सर्व रा. बोपखेल) या टोळीवर एकूण सात गंभीर गुन्हे दाखल आहेत. दिघी पोलिसांनी मकोकाचा पाठवलेला प्रस्ताव मंजूर करण्यात आला असून विक्रांत देवकुळे टोळीवर देखील कारवाई झाली आहे.

---

## प्रेयसीवर गोळीबाराचा प्रयत्न करणाऱ्या तरुणाचा जामीन अर्ज फेटाळला

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**बाणेर :** बाणेर परिसरात प्रेयसीवर गोळीबाराचा प्रयत्न करणाऱ्या गौरव नायडूचा जामीन अर्ज पुणे सत्र न्यायालयाने फेटाळला आहे. प्रेमप्रकरणातील वादातून झालेल्या या गंभीर घटनेत पिस्तुलाचा चाप अडकल्याने तरुणी थोडक्यात बचावली होती. अतिरिक्त सत्र न्यायाधीश एम. जी. चव्हाण यांनी आरोपीचा जामीन नाकारत गुन्ह्याचे स्वरूप गंभीर असल्याचे स्पष्ट केले.

गौरव महेश नायडू (वय २५, रा. पिंपरी-चिंचवड) याच्याविरुद्ध बाणेर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवण्यात आली होती. तक्रारदार तरुणी एमबीएम अभ्यासक्रम करत असून २९ ऑगस्ट रोजी सकाळी ती प्रशिक्षण संस्थेतून बाहेर पडत असताना आरोपीने तिचा मार्ग अडवून पिस्तुलातून गोळीबाराचा प्रयत्न केला. चाप अडकल्यामुळे मोठा अनर्थ टळला.दोन वर्षांपूर्वी एका मित्राच्या माध्यमातून आरोपी आणि तरुणीची ओळख झाली होती. त्यानंतर प्रेमसंबंध निर्माण झाले. मात्र, आरोपीची गुन्हेगारी पार्श्वभूमी समजल्याने तरुणीने त्याच्याशी संबंध तोडले. त्यामुळे संतापलेल्या गौरवने तिच्यावर हल्ल्याचा प्रयत्न केला. गुन्हा करून तो पसार झाला होता. पोलिसांनी त्याला खडकी रेल्वे स्थानकातून अटक केली. त्याच्या दुचाकीच्या डिक्कीतून देशी बनावटीचे पिस्तूल आणि तीन काडतुसे जप्त करण्यात आली. या खटल्यात तरुणीचे वकील खंडेराव टाचले आणि सरकारी वकील जावेद खान यांनी जामीन अर्जाला जोरदार विरोध केला. "आरोपीचे नियोजन पूर्वनियोजित होते. त्याला जामीन मिळाल्यास तो पुन्हा हल्ला करू शकतो आणि पुराव्याशी छेडछाड होण्याची शक्यता आहे," असा युक्तिवाद त्यांनी केला. न्यायालयानेही हा युक्तिवाद मान्य करत आरोपीचा जामीन अर्ज फेटाळला.

## वैद्यकीय यंत्रणेतील 'अहरण अधिकारी' वर्गाची रुग्ण कर्तव्याकडे डोळेझाक

### पगार क्लासवनचा काम मात्र मुख्यलिपीक, रुग्णाची होतेय हेळसांड?

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी चिंचवड :** शहरातील वैद्यकीय व्यवस्था ही नागरिकांच्या आरोग्यरक्षणासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. महापालिका रुग्णालये, विभागीय रुग्णालये यामध्ये डॉक्टर हे सर्वात महत्त्वाचे घटक. मात्र सध्या वायसीएमसह अनेक रुग्णालयांमध्ये डॉक्टर आपापल्या मूळ वैद्यकीय पदाप्रमाणे काम न करता प्रशासकीय खुर्च्यांवर कायमस्वरूपी रुळल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. या सर्व परिस्थितीद्वारे रुग्ण सेवेचा कसा बोजवारा उडतोय, यावर आता गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

शासकीय, निमशासकीय लिपीक संवर्गिय हक्क परिषदेचे अध्यक्ष संजय जगदाळे यांनी याबाबत महत्त्वाचे मुद्दे मांडले आहेत. त्यांच्यानुसार — अनेक डॉक्टर "अहरण अधिकारी" या पदनावाखाली रुग्ण तपासणे, शस्त्रक्रिया करणे किंवा आरोग्यसेवेची किमान जबाबदारीही पार पाडत नाहीत. पण पगार मात्र डॉक्टर पदाचा घेतात; काम मात्र प्रशासनातील मुख्य लिपीक, कार्यालयीन अधीक्षक किंवा प्रशासन अधिकारी यांच्यासारखे करतात. परिणामी रुग्णालयांचे प्रशासकीय कामकाज विस्कळीत झाले असून सर्वसामान्य रुग्णांच्या हक्कांवर गदा येत आहे.



जागोजागी अनागोंदी, प्रशासकीय फायली अडकलेल्या, विभागांमधील समन्वय नसलेली स्थिती — अशा अनेक अडचणी रुग्णालयांत निर्माण झाल्या आहेत. "पगार क्लास-वन अधिकाऱ्याचा, पण काम मुख्यलिपीकाचे... आणि तेही निट होत नाही!" अशी टिका संजय जगदाळे यांनी केली आहे.

मागणी काय? जगदाळे यांच्यानुसार, डॉक्टरांचे विभागप्रमुख म्हणून स्वागतच आहे. पण त्याच वेळी प्रशासनाशी संबंधित जबाबदाऱ्या प्रशासन अधिकारी व प्रशिक्षित कार्यालयीन अधीक्षकांच्याच जबाबदारीत ठेवाव्यात. रुग्णालयात योग्य कर्मचारी नियुक्त करावेत आणि डॉक्टरांनी मूळ कर्तव्य — रुग्णसेवा — हाच केंद्रबिंदू ठेवावा, अशी ठाम भूमिका परिषदेने मांडली आहे. रुग्णालये म्हणजे उपचाराची, आशेची, काळजीची ठिकाणे. पण डॉक्टरांच्या प्रशासकीय पदलालसेमुळे रुग्ण सेवेवर कुठे तरी विपरीत परिणाम होतोय का? या प्रश्नाचे उत्तर महापालिकेने देणे अत्यावश्यक ठरले आहे. शहराच्या आरोग्य व्यवस्थेचा पाया मजबूत ठेवायचा असेल, तर ही 'अहरण अधिकारी' संस्कृती तातडीने थांबविण्याची वेळ आली आहे, असा सूर वैद्यकीय संवर्गातही ऐकायला मिळत आहे.

---

## निगडीतील धोकादायक इमारतींचा मुद्दा तीव्र

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी-चिंचवड :** नागरिकांच्या दीर्घ प्रलंबित प्रश्नांवर तोडगा निघावा या अपेक्षेने प्रभाग १३ मधील कार्यकर्ते आणि नागरिकांनी आमदार महेश लांडगे यांच्याकडे तातडीची दखल घेण्याची मागणी केली आहे. भाजपा कार्यकर्ता सचिन काळभोर यांनी निवेदनाद्वारे घरकुल वाटप, धोकादायक इमारतींचे स्थलांतर आणि साठे वसाहतीतील सुविधा या तिन्ही गंभीर प्रश्नांवर अधिवेशनात मुद्दा उपस्थित करण्याची विनंती केली आहे.

१. जवाहरलाल नेहरू पुनर्वसन योजना

**१५ वर्षे झाली, घरकुल अजूनही मिळाले नाही.**

निगडी सेक्टर २२ मधील जवाहरलाल नेहरू पुनर्वसन योजनेंतर्गत उभारलेल्या नऊ इमारतींचे बांधकाम पूर्ण होऊन १५ वर्षे उलटली, मात्र पात्र लाभार्थ्यांना घरकुल मिळण्यात विलंब होत आहे. या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाचा स्थगिती आदेश लागू असला तरी, पीसीएमसी प्रशासन शांत बसल्याचा आरोप करण्यात आला आहे. नागरिकांना सातत्याने पायपीट करत असून, आमदार महेश लांडगे यांनी सभागृहात हा प्रश्न मांडून तातडीने दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

**२. पीसीएमसी कॉलनीतील ९ धोकादायक इमारती –**

पीसीएमसी कॉलनीमध्ये असलेल्या ९ इमारतींमध्ये तब्बल ७७४ कुटुंबे राहत असून त्या इमारती अत्यंत धोकादायक स्थितीत आहेत. छतावरील स्लॅब कोसळणे, भिंती-खिडक्या तुटणे, पाया कमकुवत होणे अशा गंभीर समस्या नागरिकांना दररोज सामोरी येत आहेत. इमारती कोसळून मोठा अपघात होण्याची शक्यता आहे.

### सौंदर्यीकरण उपक्रमांतून खुललं शहर; प्रभाग ५ आणि २९ मधील कलात्मक बदलांना नागरिकांकडून दाद

## स्वच्छता मोहिमेत चमकलेल्या कर्मचाऱ्यांचा महापालिकेत गौरव

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी : पिंपरी चिंचवड शहरात राबविण्यात येणाऱ्या स्वच्छता आणि परिसर सौंदर्यीकरण मोहिमेला गती देत या अभियानात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महापालिकेच्या आरोग्य विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल आणि सहाय्यक आयुक्त अमित पंडित यांच्या हस्ते झालेल्या या सत्कार सोहळ्यात अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या मनोबलाला प्रेरणा मिळाली.**



महापालिकेच्या 'स्वच्छ सर्वेक्षण' अभियानांतर्गत शहर स्वच्छ आणि आकर्षक ठेवण्यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबविले जात आहेत. नागरिकांच्या आरोग्याशी निगडित स्वच्छतेचे निकष पूर्ण करतानाच, शहराचे दृश्यरूप अधिक सुंदर करण्यासाठी चालविलेल्या कलात्मक उपक्रमांमुळे पिंपरी चिंचवडचे सौंदर्य वाढले आहे. या उपक्रमांची दखल घेत स्थानिक नागरिकांनीही महापालिकेच्या प्रयत्नांचे कौतुक केले आहे.

विशेषतः "इ" क्षेत्रीय कार्यालयातील प्रभाग क्रमांक ०५ मधील सखुबाई गवळी उद्यान परिसर आणि "ड" क्षेत्रीय कार्यालयातील प्रभाग क्रमांक २९ मधील पिंपळे गुरव येथील सुदर्शन चौक येथे केलेले सौंदर्यीकरण लक्षवेधी ठरले आहे. या दोन्ही ठिकाणी आकर्षक रंगसंगती, स्वच्छता, कलात्मक रचना, तसेच सुव्यवस्थित डिझाइनमुळे परिसराचे एकूणच सौंदर्य खुलले आहे. स्थानिक रहिवासी आणि नागरिकांकडून या बदलांना मोठी दाद मिळत आहे.

सखुबाई गवळी उद्यान परिसरात केलेल्या स्वच्छता आणि सजावटीच्या कामामुळे उद्यान परिसर अधिक हिरवागार व आकर्षक दिसू लागला आहे. दुसरीकडे, पिंपळे गुरव मधील सुदर्शन चौकात करण्यात आलेल्या सर्जनशील कलात्मक सजावटीमुळे चौकाला आधुनिक आणि देखणे रूप प्राप्त झाले आहे. या सौंदर्यीकरणाच्या प्रयत्नांनी परिसर चैतन्यमय झाला असल्याचे स्थानिक नागरिकांचे मत आहे.

या संपूर्ण उपक्रमात महत्त्वाची भूमिका पार पाडणाऱ्या आरोग्य विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा आरोग्य विभागाच्या वतीने सन्मान करण्यात आला. या मान्यवरांमध्ये सहाय्यक आरोग्याधिकारी राजेश भाट, शांताराम माने, श्रीराम गायकवाड, प्रभारी सहाय्यक आरोग्याधिकारी अतुल सोनवणे, मुख्य आरोग्य निरीक्षक योगेश फल्ले, शंकर घाटे, आरोग्य निरीक्षक रश्मी तुंडलवार, कोमल फर्डे, खंडेराव बैलकवाड, प्रणय चव्हाण, शैलेंद्रसिंग तंवर, गौरव गायकवाड, विकास शिरवळ आदींचा समावेश आहे.

#### "प्रामाणिक प्रयत्नांमुळे शहर आकर्षक"

उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी या प्रसंगी अधिकारी-कर्मचाऱ्यांचे कौतुक करत सांगितले की, "शहर स्वच्छ आणि आकर्षक ठेवण्यासाठी टीमवर्क, नियोजन आणि प्रामाणिक प्रयत्न महत्त्वाचे असतात. या कामात आरोग्य विभागाने उत्तम उदाहरण घालून दिले आहे." या संदेशातून पिंपरी चिंचवड महापालिका स्वच्छतेबाबत जागरूक असून नागरिकांसाठी स्वच्छ, सुंदर आणि निरोगी शहर निर्माण करण्याच्या दिशेने सातत्याने पुढे जात असल्याचे स्पष्ट होते.

## सारांश वृत्त

### अवैध सरपण वाहतुकीवर वन विभागाची धाड

**ओतूर :** ओतूर (ता. जुन्नर) येथे अवैध सरपण वाहतूक करणाऱ्या एमएच 16 एवाई 7254 या ट्रकवर वन विभागाने कारवाई केली. वनपरिक्षेत्र अधिकारी चैतन्य कांबळे व पथकाने डुंबरवाडी टोल नाक्यावर धाड टाकून ट्रकमधील सुबाभुळ, कडुलिंब, आंबा, शिरस, बाभुळ आदी सरपण जप्त केले.

चालक सोमनाथ क्षीरसागर व वाहन मालक गोपाळ करालिया यांच्याविरुद्ध भारतीय वन अधिनियम 1927 व महाराष्ट्र वन नियमावली 2014 अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे. कारवाई उपवनसंरक्षक प्रशांत खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

### इंदापूरमध्ये अवैध वाळू उपसा करणाऱ्या सात बोटींना 'जलसमाधी

**इंदापूर :** उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या अवैध वाळू उपशावर इंदापूर महसूल विभागाने मोठी कारवाई करत सात बोटी पाण्यात बुडवत तब्बल ७० लाख रुपयांचा मुद्देमाल नष्ट केला. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, बारामतीचे उपविभागीय अधिकारी वैभव नावडकर आणि इंदापूरचे तहसीलदार जीवन बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवारी (दि. ८) महसूल विभागाच्या पथकाने अजोती, सुगाव, पडस्थळ, शहा, माळवाडी आणि कांदलगाव परिसरातील नदीपात्रात सुरू असलेल्या अवैध वाळू उपशावर धडक कारवाई केली. माळवाडीचे मंडलाधिकारी औदुंबर शिंदे, इंदापूरचे ग्राममहसूल अधिकारी अशोक पोळ, वैभव मुळे, प्रताप गायकवाड, सूरज जगताप, महसूल सेवक सुधीर पाडुळे, दत्तात्रय पोळ, नामदेव फडतरे व अविनाश कुंभार यांच्या पथकाने ही कारवाई केली. अवैध वाळू उपशावरची ही मोहीम पुढेही सुरू राहणार असल्याचे तहसीलदार जीवन बनसोडे यांनी सांगितले.

## भीमा कोरेगाव शौर्य दिनासाठी

# दर्जेदार सुविधांची मागणी!

### लाखो अनुयायांच्या गर्दीची तयारी जोरात; सर्व सेवांची गुणवत्ता वाढवण्यावर भर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे : येत्या १ जानेवारी रोजी होणाऱ्या भीमा कोरेगाव विजयस्तंभ शौर्य दिन अभिवादन सोहळ्यासाठी लाखो अनुयायी महाराष्ट्रासह देशभरातून येणार असल्याने जिल्हा प्रशासनाने सर्व तयारी अधिक काटेकोरपणे सुरू केली आहे. अनुयायांना चांगल्या, दर्जेदार आणि सुयोग्य सुविधा मिळाव्यात यावर भर देत प्रशासकीय अधिकारी आणि सामाजिक प्रतिनिधींची संयुक्त बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली.**



या बैठकीत भीमा कोरेगाव विजयस्तंभ शौर्य दिन समन्वय समितीचे अध्यक्ष राहुल डंबाळे यांनी अनुयायांसाठी दिल्या जाणाऱ्या सर्व सुविधांची गुणवत्ता वाढवण्याची ठोस मागणी जिल्हाधिकाऱ्यांसमोर मांडली. ते म्हणाले, "जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली हा सातवा उत्सव होत आहे. त्यामुळे नियोजनात वर्षानुवर्षे सुधारणा होताना दिसत आहे. यंदा उत्सव अधिक परिपूर्णतेकडे जावा, यासाठी आम्ही राज्य शासन आणि प्रशासनाशी सातत्याने समन्वय साधत आहोत."

शौर्य दिनाला देशभरातून लाखो अनुयायी उपस्थित राहतात. गर्दीचे प्रमाण, वाहतूक व्यवस्था, निवारा, स्वच्छता, आरोग्य सेवा, पिण्याचे पाणी, प्रकाशयोजना आणि सुरक्षा या सर्व अंगांनी अधिकाधिक सक्षम सुविधा उपलब्ध व्हाव्यात यावर या बैठकीत सविस्तर चर्चा झाली.

**जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश दिले—**

"अनुयायांना कोणतीही अडचण येऊ नये."

"वाहतूक व्यवस्थेचे नियोजन चोख असावे."

"स्थळावर वैद्यकीय सुविधा आणि स्वच्छतागृहे पर्याप्त असावीत."

"पिण्याच्या पाण्याचा पुरवठा अखंड असावा."

"स्वच्छता आणि सुरक्षा या दोन बाबींमध्ये कोणतीही तडजोड चालणार नाही."

बैठकीत २५ प्रतिनिधींनी विविध शंका, मागण्या आणि सूचना जिल्हाधिकाऱ्यांसमोर मांडल्या. यामध्ये विशेषत: सक्षम माहिती केंद्रे, हरवलेल्या व्यक्तीसाठी हेल्पडेस्क, वाहतूक नियंत्रणासाठी अतिरिक्त पोलीस, सीसीटीव्ही देखरेख, महिलांसाठी स्वतंत्र सुविधा, दिव्यांगांसाठी विशेष व्यवस्था, अन्न-वितरण केंद्रांवर नियंत्रण, गर्दी व्यवस्थापनासाठी स्वयंसेवकांची वाढ इत्यादी मुद्द्यांवर भर देण्यात आला.

शौर्य दिनाच्या ऐतिहासिक आणि संवेदनशील पार्श्वभूमीमुळे प्रशासनाला प्रत्येक बाब अत्यंत काळजीपूर्वक हाताळावी लागते. जिल्हाधिकाऱ्यांनी बैठकीत प्रशासनाकडून करत असलेल्या सर्व तयारीचा आढावा सादर करताना अनुयायांच्या मागण्या, तक्रारी आणि मागील वर्षातील अनुभव विचारात घेऊन यंदा अधिक सुधारित व्यवस्था करण्याचे आश्वासन दिले.

## आयुष काळेने राज्यस्तरीय कुस्तीमध्ये पटकावला द्वितीय क्रमांक

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**थेऊर :** जिल्हा क्रीडा परिषद आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सिंधुदुर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा २०२५-२६ मध्ये थेऊर येथील बिशप इंटरनॅशनल स्कूलचा विद्यार्थी आयुष दत्तात्रय काळे याने प्रभावी कामगिरी करत १४ वर्षांच्या वयोगटात द्वितीय क्रमांक पटकावला. सिंधुदुर्ग येथे पार पडलेल्या या स्पर्धेत आयुषने उमदेपणा आणि दमदार खेळीच्या जोरावर सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

कुस्ती हा आयुषच्या घराचा वारसा. त्यामुळे त्याच्या खेळात दिसणारी ताकद, तंत्र आणि जिद्द ही कौटुंबिक संस्कारांची देणगी असल्याचे स्पष्ट दिसले. आयुषचे वडील मुंबई महापौर केसरी पैलवान दत्तात्रय उर्फ आबा काळे, चुलते आणि यशवंत सहकारी साखर कारखान्याचे संचालक मोरेश्वर काळे, तसेच त्याचे आजोबा माजी संचालक पांडुरंग काळे हे सर्व खुद्द कुस्तीपरंपरेशी जोडलेले असून त्यांनी आयुषला सतत प्रोत्साहन व मार्गदर्शन दिले.

काळे कुटुंबातील परंपरागत कुस्तीचे संस्कार, घरातील वरिष्ठांचे मार्गदर्शन आणि मैदानावरील आयुषची मेहनत यांचा परिणाम म्हणून त्याने राज्यस्तरावरील उपविजेतेपद पटकावून थेऊरचे नाव उज्ज्वल केले. या स्पर्धेसाठी आयुषला त्याच्या शाळेच्या क्रीडा शिक्षकांनी वेळोवेळी कौशल्यवर्धनाचे मार्गदर्शन केले, तर शाळेचे प्राचार्य यांनी आवश्यक सुविधा व सामन्यांसाठी संपूर्ण पाठबळ दिले. त्यामुळे खेळातील शिस्त, तंदुरुस्ती आणि तंत्र या तिन्ही अंगांवर आयुषची कामगिरी दिवसेंदिवस अधिक मजबूत झाली. राज्यस्तरीय स्पर्धेत मिळालेल्या या यशामुळे आयुष काळे भविष्यात राष्ट्रीय स्तरावरही उत्तुंग भरारी घेईल, अशी अपेक्षा शाळा व्यवस्थापनाने व्यक्त केली आहे. तसेच आयुषच्या कामगिरीने विद्यार्थी, पालक आणि क्रीडा क्षेत्रातील जाणकारांमध्ये आनंदाची लाट उसळली असून पुढील स्पर्धांमध्ये तो सुवर्णपदक जिंकेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. या गौरवशाली कामगिरीमुळे थेऊर आणि परिसरातील तरुण खेळाडूंनाही प्रेरणा मिळाली असून क्रीडा क्षेत्रातील त्याच्या भविष्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## मंचर वनपरिक्षेत्रात बिबटे जेरबंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** मंचर वनपरिक्षेत्र हद्दीत दोन ठिकाणी लावलेल्या पिंजऱ्यात दोन मादी बिबटे जेरबंद झाल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले यांनी दिली.

जवळे (ता. आंबेगाव) येथे नागरिकांच्या मागणीनुसार 10 डिसेंबर रोजी लायगुडे मळा परिसरात पिंजरा लावण्यात आला होता. त्यात 12 डिसेंबरच्या पहाटे सुमारे 1 ते 1.5 वर्षांची मादी बिबट जेरबंद झाली. दिवसा देखील बिबट दिसत असल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण असून शेतीची कामे करणे कठीण झाले आहे. दरम्यान, वळती येथेही नागरिकांच्या मागणीनुसार 11 डिसेंबर रोजी गोविंद गांजवे यांच्या शेतात पिंजरा लावण्यात आला होता. आज पहाटे अंदाजे दीड वर्षांची आणखी एक मादी बिबट जेरबंद झाली.

दोन्ही बिबट्यांना वनरक्षक बी.एच. पोत्रे, बिबट कृती दलाचे धर्मेंद्र ढगे, चारुदत्त बांबळे, देवेंद्र वाघ, हर्षल गावडे, प्रज्वल आवारी आणि प्रकाश हिले यांच्या सहकार्याने ताब्यात घेऊन वैद्यकीय तपासणीसाठी अवसरी वन उद्यानात हलवण्यात आले आहे.

## कोरेगाव भीमाच्या सरपंचांची फॉर्च्यूनर चोरणारा बुलढाण्यात जेरबंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**शिक्रापूर :** कोरेगाव भीमा (ता. शिरूर) येथील आदर्श सरपंच संदीप ढेरंगे यांच्या ऑफिसबाहेरून चक्क फॉर्च्यूनर कार चोरीला गेल्यानंतर परिसरात मोठी खळबळ माजली होती. या प्रकरणातील एक प्रमुख आरोपीला जेरबंद करण्यात पोलिसांना यश आले असून त्याचे नाव अब्दुल हाफिज अब्दुल अजीज (वय ४४, रा. हकीम कॉलनी, देऊळगाव राजा, जि. बुलढाणा) असे आहे. घटनेची माहिती अशी की, सरपंच

**+ सीसीटीव्हीतील पुराव्याच्या आधारे पोलिसांची थरारक कारवाई; आरोपीने दोन साथीदारांसह गुन्ह्याची कबुली दिली**

संदीप ढेरंगे यांनी १६ ऑक्टोबर रोजी त्यांची एमएच-१२ टीएच-९९५५ ही फॉर्च्यूनर कार यशराज टॉवरसमोरील डेअरी ऑफिसबाहेर उभी केली होती. पहाटे कार गायब झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी ऑफिसमधील सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यामध्ये पहाटे ४ वाजता अज्ञात चोरट्यांनी कार चोरी केल्याचे स्पष्ट झाले. यानंतर ढेरंगे यांनी शिक्रापूर पोलिसांकडे तक्रार दिली होती.

तक्रारीनंतर गुन्हा नोंदवून तपास सुरू असताना, चोरीतील आरोपी बुलढाणा जिल्ह्यात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आणि पथकातील पोलीस हवालदार जनार्दन शेळके, संजू जाधव, तसेच शिक्रापूर पोलिस स्टेशनचे पोलीस हवलदार श्रीमंत होनमाने, जयराज देवकर आणि अमोल नलगे यांनी तातडीने बुलढाणा गाठले.

## करंदीत महिलेवर बलात्कार करणारा नराधम जेरबंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**शिक्रापूर :** येथील शिक्रापूर-चाकण रस्त्यालगत राहणाऱ्या महिलेला मध्यरात्री घरात घुसून दमदाटी करत बलात्कार करणाऱ्या अज्ञात इसमाला शिक्रापूर पोलिसांनी अवघ्या काही दिवसांत जेरबंद केले आहे. अटक केलेल्या आरोपीचे नाव शिवप्रसाद भदई यादव असे असून तो मूळ उत्तर प्रदेशातील रहिवासी आहे.

घटनेनुसार, पीडित महिला घरात झोपलेली असताना रात्री सुमारे तीनच्या सुमारास आरोपीने दरवाजाची कडी उघडून घरात प्रवेश केला. अंधाराचा फायदा घेत त्याने महिलेचे तोंड दाबून आरडाओरडा केल्यास जीव घेण्याची धमकी देत तिच्यावर बलात्कार केला. घटनेनंतर आरोपीने 'कोणाला सांगितले तर परिणाम भोगावे लागतील' अशी धमकी देत पळ काढला होता.

पीडितेने शिक्रापूर पोलिसात फिर्याद दिल्यानंतर पोलिसांनी अज्ञात व्यक्तीवर गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. तपासादरम्यान आरोपी पुन्हा त्या परिसरात फिरताना पीडित महिलेला दिसल्याने तिने तत्काळ पोलिसांना माहिती दिली.

## आळंदीत नरसिंह सरस्वती सद्गुरु देवांचा वार्षिकोत्सव

### २८ डिसेंबर ते २१ जानेवारीदरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांची मेजवानी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**आळंदी :** श्री नरसिंह सरस्वती स्वामी महाराज संस्थान, मठ आळंदी यांच्या वतीने नरसिंह सरस्वती सद्गुरु देवांचा वर्षिकोत्सव २०२५ भव्य धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून २८ डिसेंबर ते २१ जानेवारीदरम्यान आयोजित करण्यात आला आहे. परंपरेनुसार २८ डिसेंबर रोजी कोठी पूजन करून उत्सवाचा शुभारंभ होणार आहे.

उत्सव काळात दैविक परंपरांचे दर्शन घडवणारे अनेक कार्यक्रम मठ परिसरात पार पडणार आहेत. २ जानेवारी रोजी श्रींचा रथोत्सव, तर ३ जानेवारी रोजी महोत्सव व मुक्तद्वार अन्नसंतर्पण दिन साजरा करण्यात येणार आहे. या निमित्त भाविकांसाठी मुक्त अन्नदान महाप्रसाद, हरिनाम गजर आणि भक्ती कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

४ जानेवारी रोजी दिंडी व रात्री पालखी मिरवणूक पारंपरिक पद्धतीने काढली जाणार आहे. ७ जानेवारी रोजी श्रींची प्रक्षाळ पूजा होणार असून भाविकांना श्रींच्या संजीवन समाधीवर जलाभिषेक करण्याची दुर्मीळ संधी मिळणार आहे.

वार्षिकोत्सवात वैकुंठवासी परमपूज्य श्री माधव महाराज गोडबोले यांची पुण्यतिथी २१ जानेवारी रोजी साजरी केली जाणार आहे. भाविक, वारकरी व नागरिकांनी या धार्मिक पर्वणीचा लाभ घ्यावा, असे आवाहन विश्वस्त मंडळाने केले आहे.

उत्सवात वासुदेव महाराज बोरसे यांची कीर्तन सेवा, तसेच मान्यवरांचे प्रवचने होणार आहेत. दररोज अखंड नामस्मरण, श्री गुरुचरित्राचे सप्ताह पद्धतीतील वाचन आणि विविध उपासना विधी आयोजित केले आहेत. भाविकांनी सहभागासाठी आपली नावे नोंदवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

रथोत्सव दिनी पौर्णिमेनिमित्त अष्टपदीचे श्रीजयदेवकृत गायन धुळे येथील दीपक रुद्र महाड मठाधिपती श्री पद्मनाभ स्वामी महाराज यांच्या वतीने होईल. कोठी पूजन दिनी ह.भ.प. अवधूत महाराज चक्रांकित बुवा यांच्या हस्ते अखंड वीणा उभारणी करण्यात येणार आहे. तसेच पालखी सोहळ्यात त्यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम पार पडणार आहे.

संस्थानतर्फे जाहीर करण्यात आले असून, वार्षिकोत्सवातील सर्व कार्यक्रमांना भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



## खानापूरमध्ये यशवंतराव चव्हाण कला-क्रीडा महोत्सव उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**खानापूर :** पुणे जिल्हा परिषद आयोजित यशवंतराव चव्हाण कला-क्रीडा महोत्सव 2025 अंतर्गत पंचायत समिती तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा 10 डिसेंबर 2025 रोजी खानापूर येथे उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत विविध क्रीडा व सांस्कृतिक विभागात शेकडो विद्यार्थी सहभागी झाले. संघटन, शिस्त आणि कलाविष्काराचा सुरेख संगम पाहायला मिळाला.

या स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ओतूर नं. २ येथील मुलींनी उल्लेखनीय कामगिरी करीत चमकदार यशाची नोंद केली. दिव्य ज्योती लेझीम पथकाने लहान गटात प्रथम क्रमांक पटकावत तालुक्यात शाळेचा झेंडा अभिमानाने फडकावला. पथकातील लेझीमची लय, ताल, शिस्तबद्ध हालचाली आणि दमदार सादरीकरणाने परीक्षकांसह उपस्थितांचे विशेष लक्ष वेधले.

प्राथमिक शाळा ओतूर नं. २ च्या विद्यार्थिनींच्या या यशामागे मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक आणि प्रशिक्षकांचा काटेकोर सराव, मार्गदर्शन आणि मुलींची मेहनत कारणीभूत ठरली आहे. स्पर्धेच्या ठिकाणी विद्यार्थिनींच्या सादरीकरणावेळी जोरदार टाळ्यांचा कडकडाट होऊन वातावरण दणाणून गेले.

महोत्सवादरम्यान विविध क्रीडा प्रकारांसह सांस्कृतिक कलांचा बहारदार कार्यक्रमही सादर करण्यात आला.

## "एकल महिलांच्या समस्या प्राधान्याने सोडवणार"

### गटविकास अधिकारी महेश डोके : शिरूर तालुक्यात मंडळनिहाय मेळावे

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**शिक्रापूर :** शिरूर तालुक्यातील एकल महिलांना शासनाच्या विविध योजनांचा जलद आणि सोयीस्कर लाभ मिळावा यासाठी तालुका प्रशासनाने अभिनव उपक्रम राबवण्यास सुरुवात केली आहे. मंडळ विभागनिहाय विशेष मेळावे आयोजित करून महिलांचे विविध समस्यांवरील अर्ज स्वीकारले जात असून, निपटारा होईपर्यंत त्यांचे सातत्याने ट्रॅकिंग करण्यात येणार असल्याची माहिती शिरूरचे गटविकास अधिकारी महेश डोके यांनी दिली.

पाबळ (ता. शिरूर) येथे आयोजित एकल महिला मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी विस्ताराधिकारी राम राठोड, समाजकल्याण वरिष्ठ सहाय्यक दिलीप धोत्रे, मंडळाधिकारी प्रमोद लोखंडे, बालविकास अधिकारी सौ. चोबे, प्रभारी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रजेश कट्टीमणी, पाबळचे सरपंच सोपान जाधव, उपसरपंच रोहिणी चव्हाण, माजी सरपंच सचिन वाबळे, धामारीच्या सरपंच सीमा शेळके, केंदूरच्या सरपंच अलका परहाड, ग्रामपंचायत अधिकारी संतोष गिरी आदी मान्यवर उपस्थित होते.

उपक्रमाच्या पार्श्वभूमीवर बोलताना गटविकास अधिकारी डोके म्हणाले, "शिरूर तालुक्यात सुमारे साडेचार हजार एकल महिला आहेत. त्यांना सक्षम, स्वावलंबी आणि आरोग्यदायी बनवण्यासाठी शासनाच्या ३० हून अधिक योजनांचा लाभ मिळू शकतो. मात्र, प्रशासनिक प्रक्रियेमुळे अनेक महिलांना हेलपाटे मारावे लागतात. यावर उपाय म्हणून मंडल विभागनिहाय मेळावे राबवले जात असून, आलेल्या प्रत्येक अर्जाचा निपटारा होईपर्यंत त्याचे केंद्रस्तरीय ट्रॅकिंग केले जाईल. त्यामुळे महिलांच्या तक्रारींचे जलद निराकरण होऊन त्यांना वेळेवर मदत उपलब्ध होईल."

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी मांडलेल्या या संकल्पनेअंतर्गत एकल महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिरे, घरकुल योजना, संजय गांधी निराधार योजना, बालसंगोपन योजना, बँक कर्ज सहाय्य योजना यांसारख्या अनेक योजनांची माहिती आणि प्रत्यक्ष लाभ मेळाव्यात देण्यात येत आहे.

या उपक्रमामुळे एकल महिलांचे सक्षमीकरण, त्यांचे हक्कांचे संरक्षण आणि आर्थिक स्वावलंबन यांना मोठी चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### स्वच्छ हवामान, दिसणारे ढगांचे समुद्र, कोंकणकड्यावरील सुवर्णसंध्याकाळ आणि कॅम्पिंगचा अनोखा अनुभव

## थंड हंगामात हरिश्चंद्रगडावर पर्यटनाचा उसळता उन्माद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जुन्नर : सह्याद्री पर्वतरांगेतील ऐतिहासिक, निसर्गरम्य आणि साहसी पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या हरिश्चंद्रगडावर ऑक्टोबर ते फेब्रुवारी या थंड हंगामात पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. थंड हवामान, स्वच्छ आकाश आणि दूरवरपर्यंत दिसणारी उत्कृष्ट दृश्यमानता यामुळे ट्रेकर्स, फोटोग्राफर्स आणि कॅम्पिंगप्रेमी गडाकडे आकर्षित होत आहेत.**



सुमारे १,४२२ मीटर उंचीवर वसलेल्या या गडावर डिसेंबर-जानेवारीत तापमान लक्षणीय घटते. पहाटे धुक्याच्या वलयातून उगवणारे सूर्यकिरण, कड्यांमधून वाहणारी गार हवा आणि पावसाळ्यानंतरची हिरवाई अशा निसर्गरम्य वातावरणाचा अनुभव घेण्यासाठी पर्यटकांची सततची वर्दळ सुरू आहे. विशेषत: कोंकणकडा हा भाग फोटोग्राफीसाठी आणि सूर्यास्तासाठी सर्वाधिक लोकप्रिय बनला आहे. हरिश्चंद्रगडावर जाण्यासाठी पाचनई, खिरेश्वर आणि बेलपाडा/ नलिची वाट हे तीन प्रमुख मार्ग पर्यटकांच्या क्षमतेनुसार उपलब्ध आहेत. पाचनई मार्ग सर्वात सोपा असल्याने कुटुंबांसाठी योग्य मानला जातो, तर खिरेश्वर मार्ग मध्यम अवघड असून अनुभवी ट्रेकर्समध्ये लोकप्रिय आहे. सर्वात आव्हानात्मक बेलपाडा/ नलिची वाट हा मार्ग फक्त अनुभवी पर्वतारोहकांसाठी योग्य असल्याचे स्थानिकांचे मत आहे.

गडाभोवती मोठ्या हॉटेल सुविधा नसल्या तरी स्थानिक ग्रामस्थांकडून होमस्टे, टेंट स्टे आणि चविष्ट घरगुती अन्नाची व्यवस्था केली जात आहे. पर्यटकांनी कचरा न टाकता पर्यावरण संवर्धनाच्या उपक्रमाला दिलेला सकारात्मक प्रतिसादही कौतुकास्पद आहे. पुणे, ठाणे, नाशिक, जुन्नर, अकोले आदी भागांतून हरिश्चंद्रगडावर सहज पोहोचता येत असल्याने सुट्टीच्या काळात पर्यटकांची अधिक गर्दी पाहायला मिळत आहे. वाढत्या पर्यटकांमुळे पाचनई व खिरेश्वर परिसरात स्थानिक मार्गदर्शक, खाद्य सेवा आणि टेंटिंग व्यवसायालाही मोठी चालना मिळाली आहे.

स्थानिक प्रशासन आणि स्वयंसेवी संस्थांनी ट्रेकर्ससाठी सुरक्षितता सूचना जारी केल्या असून योग्य शूज, जॅकेट, पाणी, टॉर्च आणि प्राथमिक उपचार पेटी बाळगण्याचे आवाहन केले आहे. नलिची वाट मार्ग निवडताना प्रशिक्षित मार्गदर्शक घेणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.



**पुणे :** पुणे जिल्हा परिषद आयोजित यशवंतराव चव्हाण कला-क्रीडा महोत्सव २०२५ अंतर्गत पंचायत समिती (तालुका) स्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन १० डिसेंबर २०२५ रोजी खानापूर येथे करण्यात आले. विविध क्रीडा व सांस्कृतिक प्रकारांनी सजलेल्या या महोत्सवात जिल्ह्यातील अनेक शाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.या स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ओतूर क्रमांक २ येथील मुलींनी दमदार कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या दिव्य ज्योती लेझीम पथकाने लहान गटात प्रथम क्रमांक पटकावून तालुक्यात मानाचा मुकुट मिळवला.

## सारांश वृत्त

### विना परवाना औषधे जप्त

**उना (हिमाचल प्रदेश)** : हिमाचल प्रदेशातील उना जिल्ह्यातील बाथू भागात परवान्याशिवाय चालणाऱ्या एका फार्मा युनिटमधून सहा लाख रुपयांची औषधे जप्त करण्यात आली आहेत, असे अधिकाऱ्यांनी शुक्रवारी सांगितले. गुरुवारी रात्री उना पोलिसांनी औषध विभागासह फार्मा युनिटवर छापा टाकला. १४ वर्षांपूर्वी बंद पडलेले हे युनिट बेकायदेशीरपणे औषधे तयार करत होते. माहितीच्या आधारे, विशेष तपास शाखेचे प्रभारी सुनील कुमार सांख्यन यांच्या नेतृत्वाखालील पथकाने युनिटवर छापा टाकला.

### हिमाचलमध्ये बर्फवृष्टीची शक्यता

**शिमला** : हिमाचल प्रदेशातील लाहौल आणि स्पिती आणि चंबा आणि कुल्लूच्या उंच भागात आठवड्याच्या शेवटी हलक्या बर्फवृष्टीची शक्यता आहे कारण नवीन पश्चिमी विक्षोभ पश्चिम हिमालयीन प्रदेशावर प्रभाव पाडण्याची शक्यता आहे, असे हवामान अधिकाऱ्यांनी सांगितले. राज्यातील उर्वरित नऊ जिल्ह्यांमध्ये हवामान सामान्य राहील, असे त्यांनी सांगितले. १७, १८ आणि १९ डिसेंबर रोजी लाहौल आणि चंबा येथील उंच भागात हलक्या स्वरूपाची बर्फवृष्टी होण्याची शक्यता आहे.

### पंजाब, हरियाणात थंडीची लाट



**चंदीगड** : पंजाब आणि हरियाणामध्ये थंडीची स्थिती कायम आहे, चंदीगडमध्ये शुक्रवारी ६.८ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले, जे सामान्यपेक्षा दोन अंशांनी कमी आहे, असे हवामान खात्याने सांगितले. पंजाबमध्ये, अमृतसरमध्ये किमान तापमान ५.९ अंश सेल्सिअस नोंदवले गेले, जे सामान्यपेक्षा एक अंश जास्त आहे, लुधियाना ६.४ अंश सेल्सिअस, पटियाला ६.९ अंश सेल्सिअस, पठाणकोट ६.६ अंश सेल्सिअस आणि भटिंडा ६ अंश सेल्सिअस होते, असे हवामान खात्याने सांगितले. फरीदकोट आणि गुरुदासपूर येथे किमान तापमान अनुक्रमे ५.२ आणि ७.२ अंश सेल्सिअस नोंदवले गेले.

## रोहिंग्या घुसखोरीची प्रकरणे उघडकीस

# रायबरेलीत ५० हजार बनावट प्रमाणपत्रे

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : रायबरेली जिल्हा प्रशासनाने सलोन डेव्हलपमेंट ब्लॉकमधील १२ ग्रामपंचायतींमध्ये कथितरित्या जारी केलेले ५२,८४६ बनावट जन्म प्रमाणपत्रे रद्द करण्यासाठी मोठी मोहीम सुरू केली आहे.

गेल्या वर्षी राष्ट्रीय तपास संस्थेला (एनआयए) बेकायदेशीर बांगलादेशी स्थलांतरित आणि रोहिंग्या घुसखोरांच्या चौकशीदरम्यान या भागात अनियमितता असल्याचा संशय आल्यानंतर मोठ्या प्रमाणात कागदपत्रांच्या फसवणुकीचे प्रकरण उघडकीस आले. जुलै २०२४ मध्ये, एनआयएने बेकायदेशीर बांगलादेशी स्थलांतरित झाकीरला बेंगळुरू येथून अटक केली. त्याच्याकडून सलोन ब्लॉकमधील एका गावातील बनावट जन्म प्रमाणपत्र जप्त करण्यात आले. त्यानंतर, एनआयएच्या सखोल तपासात बनावट प्रमाणपत्रांचे मोठे रॅकेट उघड झाले.

रायबरेलीत सुरू केलेली कारवाई ही राज्यातील सुरू असलेल्या पडताळणी मोहिमेतील एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे, ज्याचा उद्देश अनेक जिल्ह्यांमध्ये कार्यरत असलेल्या बेकायदेशीर परदेशी नागरिकांना आणि ओळख फसवणूक करणाऱ्या नेटवर्कना लक्ष्य करणे आहे. रायबरेलीच्या मुख्य विकास अधिकारी (सीडीओ) अंजुलता यांनी पुष्टी केली की रद्द करण्याची प्रक्रिया अधिकृतपणे सुरू झाली आहे आणि गेल्या तीन दिवसांत ८७८ हून अधिक बनावट प्रमाणपत्रे रद्द करण्यात आली आहेत. रायबरेलीच्या जिल्हा प्रशासनाने सलोन विकास ब्लॉकच्या १२ ग्रामपंचायतींमध्ये कथितरित्या जारी केलेले ५२,८४६ बनावट जन्म प्रमाणपत्रे रद्द करण्यासाठी मोठी मोहीम सुरू केली आहे. गेल्या वर्षी राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) बेकायदेशीर बांगलादेशी स्थलांतरित आणि रोहिंग्या घुसखोरांच्या चौकशीदरम्यान या भागात अनियमितता असल्याचा संशय आल्यानंतर व्यापक कागदपत्रांची फसवणूक उघडकीस आली. ही कारवाई राज्यातील सुरू असलेल्या पडताळणी मोहिमेतील एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. तिचा उद्देश अनेक जिल्ह्यांमध्ये कार्यरत असलेल्या बेकायदेशीर परदेशी नागरिकांना आणि ओळख फसवणूक करणाऱ्या नेटवर्कना लक्ष्य करणे आहे.

रायबरेलीच्या मुख्य विकास अधिकारी (सीडीओ) अंजुलता यांनी पुष्टी केली की रद्द करण्याची प्रक्रिया अधिकृतपणे सुरू झाली आहे आणि गेल्या तीन दिवसांत ८७८ हून अधिक बनावट प्रमाणपत्रे रद्द करण्यात आली आहेत. त्या म्हणाल्या, एक विशेष पथक तयार करण्यात आले आहे आणि सर्व बनावट प्रमाणपत्रे रद्द होईपर्यंत ही प्रक्रिया सुरू राहील. सीडीओच्या मते, जिल्हा पंचायत राज अधिकारी (डीपीआरओ) सौम्या शील सिंग यांनी एप्रिल २०२५ मध्ये जिल्हा दंडाधिकारी कार्यालयामार्फत महासंचालकांना (जनगणना) सविस्तर अहवाल सादर केला आणि या आठवड्याच्या सुरुवातीला रद्द करण्याची अंतिम मंजुरी मिळाली.

जुलै २०२४ मध्ये एनआयएने बेंगळुरू येथून बेकायदेशीर बांगलादेशी स्थलांतरित झाकीरला अटक केली तेव्हा या रॅकेटचा प्रथम पर्दाफाश झाला. त्याच्याकडून सलोन ब्लॉकमधील एका गावातील बनावट जन्म प्रमाणपत्र जप्त करण्यात आले. अधिकाऱ्याने पुढे सांगितले की, एनआयएने आपला तपास वाढवला आणि केरळ आणि कर्नाटकमध्ये देशविरोधी कारवायांमध्ये सहभागी असलेल्या संशयितांना अटक केली, तसतसे आणखी बनावट प्रमाणपत्रे उघडकीस आली.

# शिवराज पाटील यांचे निधन

## काँग्रेसचे निष्ठावान; राज्यसभेत श्रद्धांजली

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : देशाचे माजी केंद्रीय गृहमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शिवराज पाटील चाकूरकर (९१) यांचे शुक्रवारी पहाटे अल्पशा आजाराने निधन झाले. शिवराज पाटील चाकूरकर हे आजन्म काँग्रेसचे निष्ठावंत राहिले. काही वर्षांपासून ते राजकारणातून निवृत्त झाले होते.

राज्यासह देशाच्या राजकारणातील स्वच्छ प्रतिमेचे नेते म्हणून शिवराज पाटील चाकूरकर यांची ओळख होती. १९८० मध्ये शिवराज पाटील यांनी त्यांच्या राजकीय कारकिर्दीचा श्रीगणेशा केला. १९८० मध्ये ते लातूर मतदारसंघातून पहिल्यांदा लोकसभेत निवडून आले. त्यानंतर १९९९ पर्यंत सलग सात वेळा त्यांनी निवडणूक जिंकल्या.

इंदिरा गांधी, राजीव गांधी यांच्या काळात त्यांनी राज्यमंत्री, वाणिज्य, विज्ञान-तंत्रज्ञान मंत्री अशी अनेक पदे भूषवली. १० वे लोकसभा अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले. गेल्या काही वर्षांपासून शिवराज पाटील चाकूरकर हे राजकारणापासून अलिप्त होते. त्यांच्या पश्चात मुलगा शैलेष पाटील चाकूरकर सुन अर्चना पाटील चाकूरकर आणि नातवंडे असा परिवार आहे. दरम्यान, राज्यसभेने शुक्रवारी माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील यांना श्रद्धांजली वाहिली. अध्यक्ष सी.पी. राधाकृष्णन म्हणाले की, देशाने एक आदरणीय संसदपटू आणि एक सक्षम प्रशासक गमावला आहे. पाटील यांनी २००४ ते २०१० पर्यंत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करून राज्यसभेचे सदस्य म्हणून काम पाहिले.

## बिहार विजयासाठी रालोआ सदस्यांना मेजवानी

# पीएम मोदी यांच्यासह खाने पे चर्चा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : गुरुवारी रात्री पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या सरकारी निवासस्थानी रात्रीच्या जेवणाचे आयोजन केले होते. भाजपसह सर्व एनडीए खासदार उपस्थित होते.

भाजपचे ज्येष्ठ खासदार अनुराग ठाकूर यांनी पुढील मेजवानीची घोषणाही केली. ते म्हणाले की, बिहारमधील प्रचंड विजयानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आम्हाला जेवणासाठी आमंत्रित केले होते. आता, बंगालमधील विजयानंतर पुढील जेवणाचे आयोजन केले जाईल, असे ते म्हणाले.

अनुराग ठाकूर म्हणाले, पंतप्रधानांनी आम्हाला आमंत्रित केले आणि बोलले, याबद्दल आम्ही सर्व आभारी आहोत. आम्हाला सर्वांना त्यांना भेटण्याची संधी मिळाली. पंतप्रधान मोदींनी आमंत्रित केले, तेव्हा खासदार किती आनंदी होते हे तुम्ही पाहू शकता. वृत्तानुसार, बहुतेक खासदार बसने आले आणि त्यांना स्वतंत्र टेबल देण्यात आले, ज्यामध्ये सात ते आठ खासदार एकाच टेबलावर बसले होते. शिवाय, एनडीएमध्ये चांगल्या समन्वयासाठी, भाजप खासदारांसोबत आघाडी पक्षाचा किमान एक खासदार टेबलावर उपस्थित असावा असा निर्णय घेण्यात आला. उपस्थित खासदारांच्या म्हणण्यानुसार, यजमान पंतप्रधान मोदी स्वतः बहुतेक टेबलांवर गेले आणि खासदारांना जेवणाची विनंती केली. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पंतप्रधान मोदी बसलेल्या टेबलावर माजी पंतप्रधान एचडी देवेगौडा आणि इतर सहयोगी पक्षांचे नेते देखील उपस्थित होते. खासदारांनी संसदीय मुद्दे, रस्त्यांचे मुद्दे, राजकीय मुद्दे, निवडणूक निकाल आणि आगामी निवडणुका आणि विरोधी पक्षाचे मुद्दे यासह विविध मुद्द्यांवर आपापसात चर्चा केली. पक्षाच्या एका प्रमुख नेत्याने सांगितले की, तुमचा संवाद, सहकार्य आणि समन्वय मजबूत करण्यासाठी हा एक अतिशय महत्त्वाचा उपक्रम आहे. विशेष म्हणजे, संपूर्ण कार्यक्रमात कोणतेही भाषण झाले नाही. एनडीएने आपली एकता दाखवली आणि युती आणखी ताकदीने पुढे जाईल हे यातून दाखवून दिले, असेही सांगण्यात आले.

# मंत्र्यांच्या अनुपस्थितीमुळे राज्यसभा तहकूब

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरू असून, शुक्रवारी कॅबिनेट मंत्र्यांच्या अनुपस्थितीमुळे राज्यसभा १० मिनिटांसाठी तहकूब करण्यात आली. १३ डिसेंबर २००१ रोजी संसदेवर झालेल्या हल्ल्यातील शहीदांना श्रद्धांजली वाहल्यानंतर सभागृहाचे कामकाज पुन्हा सुरू झाले, तेव्हा ही परिस्थिती उद्भवली. कामकाज सुरू असताना, विरोधी पक्षाच्या खासदारांनी सभागृहात कोणताही कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्याचे निदर्शनास आणून दिले.

अध्यक्ष सी.पी. राधाकृष्णन म्हणाले की ते हा मुद्दा सरकारसमोर उपस्थित करतील आणि एका कनिष्ठ मंत्र्याला कॅबिनेट मंत्र्याची विनंती करण्यास सांगितले. ते म्हणाले, मला प्रक्रिया समजते. मी मंत्र्याला विनंती केली आहे. कॅबिनेट मंत्र्याने यावे. मात्र, विरोधकांचे समाधान झाले नाही. काँग्रेस नेते जयराम रमेश म्हणाले, हा सभागृहाचा अपमान असून, कॅबिनेट मंत्री येईपर्यंत सभागृह तहकूब करावे लागेल. सुमारे पाच मिनिटे वाट पाहिल्यानंतर, सभापतींनी कामकाज १० मिनिटांसाठी तहकूब केले.

सभागृह पुन्हा सुरू झाले तेव्हा संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी कॅबिनेट मंत्र्यांच्या अनुपस्थितीबद्दल खेद व्यक्त केला. माजी सभापती आणि माजी गृहमंत्री शिवराज पाटील यांच्या निधनाबद्दल श्रद्धांजली वाहण्यासाठी त्यांना लोकसभेत जावे लागले, असे त्यांनी स्पष्ट केले. सभागृह नेते जेपी नड्डा यांच्या नावाने लोकसभेत प्रश्न विचारण्यात आले होते, म्हणूनच ते उपस्थित होते, असेही त्यांनी नमूद केले. रिजिजू म्हणाले, सभेत कोणताही कॅबिनेट मंत्री उपस्थित नव्हता याबद्दल मला वाईट वाटते. काँग्रेस नेते प्रमोद तिवारी म्हणाले की, पाटील हे राज्यसभेचे माजी सदस्य होते, त्यामुळे त्यांना तिथेही श्रद्धांजली वाहण्यात यावी. रिजिजू यांनी उत्तर दिले की औपचारिकता पूर्ण होण्यास थोडा वेळ लागत आहे आणि राज्यसभेतही योग्य श्रद्धांजली वाहिली जाईल, असे त्यांनी सांगितले. मात्र, ही अनुपस्थिती चर्चेचा विषय ठरली.

## राहुल विरोधात प्रियंका संघर्षाचा दावा

# काँग्रेस पक्षात अंतर्गत कलह

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : ओडिशा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मोहम्मद मुकीम यांच्या पत्रानंतर भारतीय जनता पक्षाने (भाजप) आक्रमक भूमिका घेतली आहे. भाजपचा दावा आहे की काँग्रेस पक्षात अंतर्गत कलह आहे आणि पक्षात टीम राहुल गांधी विरुद्ध टीम प्रियंका गांधी, असा संघर्ष आहे. मुकीम यांनी राज्यसभा खासदार सोनिया गांधी यांना पत्र लिहून नेतृत्वाबद्दल चिंता व्यक्त केली होती आणि प्रियंका गांधींनी नेतृत्वाची भूमिका घ्यावी असे म्हटले होते.

भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते शहजाद पूनावाला यांनी म्हटले आहे की, टीम प्रियंका विरुद्ध टीम राहुल असा हा संघर्ष आहे. काँग्रेस पक्षातील अंतर्गत कलह आता उघड झाला आहे. ओडिशातील एका वरिष्ठ काँग्रेस नेत्याने सोनिया गांधींना पत्र लिहून खरगे यांना काढून प्रियंका यांना आणण्याची विनंती केली आहे. त्यांनी राज्य आणि केंद्रीय नेतृत्वावरही प्रश्न उपस्थित केले आहेत. ओडिशाचे नेते मोहम्मद मुकीम यांनी राष्ट्रीय स्तरावरील नेतृत्व संकटावर प्रश्न उपस्थित केले आहेत आणि पक्षाची पुनर्बांधणी करण्यासाठी संघटनात्मक आणि वैचारिक पातळीवर सुधारणांबद्दल बोलले आहे, याकडे भाजपने लक्ष वेधले आहे.

मुकीम म्हणाले, मी सोनिया गांधींना एक पत्र लिहिले होते, ज्यामध्ये त्यांनी म्हटले होते की पक्ष कठीण काळातून जात आहे आणि त्यांना त्यांच्या सल्ल्याची आणि नवीन नेतृत्वाची आवश्यकता आहे. मल्लिकार्जुन खर्गे हे खूप ज्येष्ठ नेते आहेत, परंतु वय त्यांच्या बाजूने नाही. ते ८३ वर्षांचे आहेत. विरोधी पक्षाच्या नेत्याला जे कठोर परिश्रम, धावपळ आणि लोकांशी संपर्क साधण्याची आवश्यकता आहे ते शक्य नाही. त्यांनी सल्लागार म्हणून राहावे आणि एका तरुणाला आघाडीवर आणावे. आमच्याकडे प्रियंका आणि इतर अनेक तरुण आहेत जे पक्षाला बळकटी देतील. राहुल हे काँग्रेस पक्षाचे नेते आहेत आणि त्यांची भूमिका पार पाडत आहेत. कोणीतरी अध्यक्ष बनेल आणि त्यांची भूमिका पार पाडेल. काँग्रेसच्या एका खऱ्या कार्यकर्त्या म्हणून सोनिया गांधींना हे माझे वैयक्तिक आवाहन आहे, असेही त्यांनी म्हटले आहे.

माजी आमदार मुकीम यांनी सोनिया गांधींना पत्र लिहून अनेक राज्यांमध्ये काँग्रेसच्या पराभवाची माहिती दिली. चुकीचे निर्णय, चुकीचे नेतृत्व आणि चुकीच्या हातात जबाबदारी यामुळे काँग्रेस पक्ष कमकुवत झाला आहे. या चुका दुरुस्त करण्याऐवजी, आपण त्या पुन्हा करत आहोत आणि त्याचे परिणाम संपूर्ण देशासमोर आहेत. काँग्रेस नेतृत्व आणि देशांमधील तरुणांमधील दुरावा निर्माण झाल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली आहे.

# दिल्लीच्या प्रदुषणाने खासदारही त्रासले..!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : बिजू जनता दलाचे खासदार मानस रंजन मंगराज यांनी संसदेचे अधिवेशन दिल्लीबाहेर आयोजित करण्याची मागणी केली आहे. ते म्हणाले की, दिल्लीत दरवर्षी प्रदूषण खूप जास्त असते. अशा परिस्थितीत संसदेचे हिवाळी अधिवेशन आणि अर्थसंकल्पीय अधिवेशन दिल्लीबाहेर आयोजित केले पाहिजे.

ते म्हणाले की, दिल्लीतील हवा दरवर्षी प्रदूषित होते आणि ही आपत्ती मानवनिर्मित आहे. शून्य प्रहरात ओडिशाचे खासदार म्हणाले की, दिल्लीतील प्रदूषण दरवर्षी वाढत असून, याला तोंड देण्यासाठी ओडिशाचा फॉर्म्युला स्वीकारला पाहिजे. मानस मंगराज म्हणाले की, ओडिशात सरकार दरवर्षी नैसर्गिक आपत्तींना तोंड देते आणि कधीही मोठे संकट उद्भवत नाही. आम्ही ओडिशातून आलो आहोत, जिथे वारंवार चक्रीवादळे आणि पूर येतात. इतरही आपत्ती येतात. आम्ही त्यांचा नियमितपणे सामना करतो. त्यामुळे दिल्लीतील संकट आम्हाला समजते. पण दिल्लीतील संकट आम्हाला त्रास देते. दिल्लीतील खासदार प्रदूषणाचा सामना करत आहेत आणि त्यांच्यासोबत असलेले कर्मचारीही प्रदूषणाचा सामना करत आहेत. या लोकांना ज्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे त्या आपण दुर्लक्षित करू शकत नाही. ही सामान्य गोष्ट नाही, दुर्लक्षित करता येईल अशी गोष्ट आहे, असे ते म्हणाले. अशी अनेक शहरे आहेत जिथे हवा स्वच्छ आहे. अशा परिस्थितीत संसदेचे अधिवेशन तेथे आयोजित केले जाऊ शकते. भुवनेश्वर, हैदराबाद, गांधीनगर, बेंगळुरू, गोवा आणि देहरादून येथे अधिवेशने आयोजित केली जाऊ शकतात. चक्रीवादळ आल्यास काही तासांत ओडिशातून लाखो लोकांना बाहेर काढता आले, तर सार्वजनिक आरोग्य सुनिश्चित करण्यासाठी खासदारांना इतर ठिकाणी हलवू शकते.

### आंध्रात बस अपघातात ९ जण ठार

**अमरावती** : आंध्र प्रदेशातील अल्लुरी सीताराम राजू जिल्ह्यातील घाट रोडवर एका बसला अपघात झाला, ज्यामध्ये किमान नऊ जणांचा मृत्यू झाला आणि २२ जण जखमी झाले. मिळालेल्या माहितीनुसार, पहाटे ५:३० वाजता चिंतुरू आणि भद्राचलम दरम्यान बसचे नियंत्रण सुटले आणि ती खोल दरीत कोसळली. भद्राचलम मंदिराचे दर्शन घेतल्यानंतर सुमारे ३५ जण अन्नावरमला जात होते. चित्तूरहून शेजारच्या तेलंगणाला जाणाऱ्या या बसमध्ये चालक आणि क्लीनरसह ३७ जण होते.

# पाकमध्ये इम्रानखान समर्थक घाबरले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कराची** : पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रानखान दोन वर्षांहून अधिक काळ तुरुंगात आहेत. दरम्यान, त्यांचे जवळचे सहकारी, माजी आयएसआय प्रमुख फैज हमीद यांना १४ वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आल्यानंतर, इम्रानखान समर्थक घाबरले आहेत.

गुरुवारी जाहीर झालेल्या निकालात हमीद यांना राजकीय सहभाग, सत्तेचा गैरवापर, नागरिकांना हानी पोहोचवणे आणि अधिकृत गुपिते कायद्याचे उल्लंघन केल्याबद्दल दोषी ठरवण्यात आले आहे. राजकीय सहभाग हा सर्वात महत्त्वाचा पैलू मानला जातो. ९ मे रोजी झालेल्या हिंसाचाराच्या संदर्भात हमीद यांना शिक्षा सुनावण्यात आल्याचे म्हटले जात आहे. शिवाय, जर हे खरे असेल तर हमीद यांची शिक्षा ही फक्त सुरुवात आहे.

इम्रानखान आणि इतर समर्थकांना भीती आहे की ९ मे रोजी झालेल्या हिंसाचाराशी संबंधित अधिक व्यक्तींवर लष्करी न्यायालयाचे आरोप लागू शकतात. या व्यक्तींना कठोर शिक्षा होऊ शकतात.

यापूर्वी, इम्रान खानच्या अटकेभोवती झालेल्या हिंसाचारात सहभागी असल्याचा आरोप असलेल्यांवर लष्करी न्यायालये खटला चालवू शकतात अशाच चर्चा होत्या. पाकिस्तानी लष्करानेही एक निवेदन जारी केले आहे ज्यामध्ये फैज हमीदला लष्करी कायद्यानुसार शिक्षा देण्यात आली आहे. तथापि, लष्कराच्या विधानातील शेवटच्या परिच्छेदाची व्यापक चर्चा होत आहे.

या परिच्छेदात, लष्कराने म्हटले आहे की राजकीय निषेध भडकवण्याच्या आणि अस्थिरता निर्माण करण्याच्या प्रकरणांची स्वतंत्र चौकशी सुरू आहे. त्यात सहभागी असलेल्यांवर कारवाई केली जाईल. लष्कराच्या विधानावरून स्पष्ट होते की त्यांनी फैज हमीद आणि इतर अनेक नेत्यांना हिंसाचारासाठी जबाबदार धरले आहे. हे स्पष्ट आहे की आणखी व्यक्तींवरही कारवाई केली जाऊ शकते.

पाकिस्तानला रक्तपाताचा मोठा इतिहास आहे, सत्ता उलथवून टाकल्यानंतरही शासक सुरक्षित आश्रयासाठी आसुसलेले आहेत. झुल्फिकार अली भुट्टो, परवेझ मुशर्रफ किंवा इम्रान खान असोत, पुन्हा एकदा भीती व्यक्त होत आहे की, लष्कराला प्रचंड सत्ता मिळाल्याने, पाकिस्तानमधील राजकीय विरोधकांना निवडकपणे लक्ष्य केले जाऊ शकते.

## सिद्धरामय्या पुत्राच्या टिप्पणीने डीके भडकले

# कर्नाटक मुख्यमंत्रीपदाचा वाद कायम?

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**बेंगळुरू** : कर्नाटकच्या मुख्यमंत्रीपदावरून सुरू असलेला वाद अजूनही चर्चेत आहे. काँग्रेस हायकमांडने दोन प्रमुख नेत्यांमधील चर्चेद्वारे वाद सोडवल्यानंतर तो पुन्हा एकदा वाढत असल्याचे दिसून येत आहे. ताज्या वादाच्या मुळाशी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांचे पुत्र यतिंद्र सिद्धरामय्या यांचे एक विधान आहे, ज्यामुळे उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांचे समर्थक संतप्त झाले आहेत. कर्नाटकातील नेतृत्वाबाबतच्या अफवा फेटाळून लावत, पक्षनेतृत्वाने मुख्यमंत्री पदात कोणताही बदल होणार नाही हे स्पष्ट केले आहे, असे यतींद्र यांनी म्हटले आहे.

बेळगावी येथे माध्यमांशी बोलताना यतिंद्र म्हणाले, मुख्यमंत्रीपदावरून कोणताही वाद नाही. मी हे आधीही सांगितले आहे. आता सर्व काही स्पष्ट आहे. हायकमांडने स्पष्टपणे सांगितले आहे की सध्या नेतृत्वात कोणताही बदल होणार नाही. हा वाद यतींद्र यांच्या साध्या विधानाबद्दल कमी आणि गेल्या आठवड्यात त्यांनी वापरलेल्या भाषेबद्दल जास्त आहे. गेल्या आठवड्यात एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी म्हटले होते की नेतृत्व बदलाची आशा बाळगणाऱ्यांनी त्याचे स्वप्न पाहत राहावे, परंतु राष्ट्रीय नेतृत्वाने आधीच हा प्रश्न सोडवला आहे, असे विधान त्यांनी केले होते. उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांना यतींद्र यांच्या विधानाबद्दल विचारले असता ते म्हणाले, मला वाटते की मुख्यमंत्री स्वतः या प्रकरणात त्यांच्या वतीने उत्तर देतील. तथापि, त्यांच्या समर्थकांनी यतींद्र यांना फटकारले.

काँग्रेस आमदार इक्बाल हुसेन म्हणाले, आपण नेतृत्वाबद्दल बोललो तर नोटिसा जारी केल्या जातात. आमचे हायकमांड कमकुवत नाही, तर मजबूत आहे. काँग्रेस पक्षात शिस्त आहे. आम्ही त्या शिस्तीला वचनबद्ध आहोत. हायकमांडला कोणीही मागे टाकू शकत नाही. पण गोष्ट अशी आहे की, आपण काही बोललो तर ते चुकीचे ठरते आणि जर तो काही बोलला तर ते जादू बनते. अशी विधाने करण्यापूर्वी त्यांनी परिस्थिती समजून घेतली पाहिजे. आपण सर्वांनी आपल्या मर्यादा जाणून घेतल्या पाहिजेत, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

कर्नाटकच्या मुख्यमंत्रिपदावरून वाद गेल्या काही काळापासून सुरू आहे. शिवकुमार समर्थकांचा असा दावा आहे की सरकार स्थापन झाल्यावर अडीच वर्षांचा कार्यकाळ निश्चित करण्यात आला होता आणि सिद्धरामय्या यांनी त्यांचा निम्म्या कार्यकाळानंतर राजीनामा दिला होता.

शिवकुमार यांनी कधीही या मुद्द्यावर उघडपणे भाष्य केले नसले तरी, त्यांच्या समर्थकांनी मुख्यमंत्र्यांविरुद्ध मोहीम सुरू केली. त्यानंतर, हायकमांडला हस्तक्षेप करावा लागला आणि काही दिवसांपूर्वी दोन्ही पक्षांमध्ये एकमत झाले.